| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १८६ वा | गुरूवार दिनांक ०२ ऑक्टोंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### गुंगीकारक गांजा चिलीम मध्ये भरुन सेवन करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- उमरगा पोलीस ठाणे: अंतर्गत राम रा.कवठा ह.मु. कुंभार पट्टी उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२५ रोजी पंतगे रोड पाटबंधारे ऑफीसचे पाठीमागे झाडाखाली गुंगीकारक गांजा पदार्थ चिलीम मध्ये भरुन सेवन/ओढत असताना उमरगा पोलीसांना मिळून आला. बाळु रा. कोळीवाडा उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२५ रोजी हुतात्मा स्मारक उदयानातील झाडाखाली उमरगा येथे गुंगीकारक गांजा पदार्थ चिलीम मध्ये भरुन सेवन/ओढत असताना उमरगा पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरुध्द एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ कलम ८(क), २७ अन्वये उमरगा पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

### कदेर येथे गुटखा व तत्सव पदार्थ विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत युसुफ रा. कदेर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.३०.०९.२०२५ रोजी साठे चौक कदेर येथे मुस्कान किराणा दुकानात कदेर येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विमल पान मसाला, व्ही एक टोबॅको तंबाखु, वजीर गुटखा असे एकुण १७,८५० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना उमरगा पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम-१२३,२२३, २७५, भा.न्या. सं. सह अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ५९ अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### गुटखा,विमल पान मसाला २६ पुड्या, एक टोबॅको तंबाखु विकताना पकडले

धाराशिव (प्रतिनिधी)- प्रविण रा. गुंजोटी ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.३०.०९.२०२५ रोजी संदीप किराणा दुकान गुंजोटी येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विमल पान मसाला २६ पुड्या, व्ही एक टोबॅको तंबाखु, ५३ पुड्या असे एकुण ४,७१० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना उमरगा पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम-१२३,२२३, २७५, भा.न्या. सं. सह अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ५९ अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव येथे 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.३० सप्टेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १६७ कारवाया करुन १,३९,४०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी
## १ कोटी रुपये निधी वितरित केला

धाराशिव,दि.१ (जिमाका) : जिल्ह्यात दि. २२ ते २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील परंडा,भूम,वाशी व कळंब तालुक्यातील अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती.एकूण ५४ गावांवर या परिस्थितीचा परिणाम झाला असून भूम तालुक्यातील १७, परंडा तालुक्यातील २२,वाशी तालुक्यातील ७,कळंब तालुक्यातील ११ आणि धाराशिव तालुक्यातील १ गावांचा समावेश आहे.

**आरोग्य संस्थांचे नुकसान**

पूरामुळे जिल्ह्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २४ उपकेंद्रांचे नुकसान झाले आहे.यामध्ये इमारतींची गळती,प्लास्टर पडझड तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानी गळती यांचा समावेश आहे.

**संपर्क तुटलेली गावे**

जिल्ह्यातील एकूण ४४ गावे पूरकाळात बाहेरील संपर्कापासून तुटली होती.मात्र २९ व ३० सप्टेंबरपासून पावसाचा जोर कमी झाल्याने व प्रकल्पातील विसर्ग घटल्याने सर्व गावांचा संपर्क पूर्ववत झाला आहे.

**साथरोग स्थिती**

पूरग्रस्त भागात कोणत्याही गावामध्ये साथरोग उद्रेक झालेला नाही.आरोग्य विभागाकडून दैनंदिन सर्वेक्षण करून जलजन्य व कीटकजन्य आजारांचे १५ रुग्ण,५०६ गरोदर माता,१७०५ उच्च रक्तदाब रुग्ण,१३०३ मधुमेही रुग्ण,३५ क्षयरोगी व ३४ गंभीर रुग्ण शोधण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**आरोग्य विभागाची कार्यवाही**

पूरग्रस्त गावांमध्ये आरोग्य पथकांकडून दैनंदिन सर्वेक्षण करण्यात येत आहे.२७ सप्टेंबर रोजी सर्व विभागांच्या समन्वयातून संयुक्त सर्वेक्षण,तर २ ऑक्टोबर रोजी पुनः सर्वेक्षणाचे नियोजन आहे.जिल्हा परिषदेत २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. स्थलांतरित नागरिकांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येत आहे.८५ आशा स्वयंसेविकांना साथरोग किट उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.२३८ पाणी स्रोतांची शुद्धीकरणासाठी तपासणी व कार्यवाही करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व ४४ प्रा.आ.केंद्रांमध्ये रुग्णवाहिका उपलब्ध आहे.१८७ फॉगिंग मशीन ग्रामपंचायतस्तरावर कार्यरत आहेत. औषध साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आला आहे.

तालुकास्तरावर साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी १ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी पूरग्रस्त गावांना भेट देऊन आरोग्य विभागाच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच जिल्हास्तरीय आरआरटी सदस्य व अधिकारी यांनीही पूरग्रस्त भागांना भेटी देऊन स्थितीचा आढावा घेतला.

## अतिवृष्टी-पूरामुळे मोठे नुकसान : ८ जणांचा मृत्यू
## हजारो शेतकरी व नागरिक पूरपरिस्थितीने बाधित

धाराशिव,दि.१ ऑक्टोबर (जिमाका) जिल्ह्यात जून ते सप्टेंबर २०२५ या काळात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे जिल्ह्यात मोठी हानी झाली आहे.जिल्ह्याची पावसाची वार्षीक सरासरी ६०३.१० मि.मी.पावसाची असताना तुलनेत तब्बल ९७३.७ मि.मी. पाऊस झाला आहे.म्हणजेच १६१ टक्के इतका पाऊस पडला आहे.या विक्रमी पावसाने शेतकरी,नागरिक,पायाभूत सुविधा,पशुधन आणि दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पूरामुळे आतापर्यंत ८ नागरिकांचा मृत्यू झाला आहे.यात धाराशिव-१,परंडा-१, भूम-२,उमरगा-१,लोहारा-१ आणि कळंब-२ व्यक्तींचा समावेश आहे.पशुधन व घरांचे नुकसान झाले आहे.४०६ पशुधन वाहून गेले (मदत - ४६.४९ लाख),३२०६ घरांचे नुकसानीची मदत म्हणून १ कोटी ४१ लक्ष ३३ हजार रुपये पात्र ३१४९ कुटुंबांपैकी १,७८१ कुटुंबांना तातडीची मदत वाटप करण्यात आली आहे.

२१ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण होऊन शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ७३७ गावे बाधित झाली.४ लक्ष ३३ हजार शेतकरी प्रभावित झाले. त्यांचे जिरायत क्षेत्र - ४ लक्ष २५ हजार ७२८ हेक्टर,बागायत क्षेत्र - २१ हजार ५२० हेक्टर व फळपिके - २,४३२ हेक्टर असे एकूण ४ लक्ष ४९ हजार ६८१ हेक्टर क्षेत्र पुराच्या पाण्याने बाधित झाले आहे.

जुलै व ऑगस्टमध्ये झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीची मदत म्हणून शासनाकडून १८९ कोटी ६० लक्ष ६७ हजार रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.यामध्ये २ लक्ष ३४ हजार ९९५ शेतकरी असून ५९ हजार ४७३ शेतकऱ्यांची नावे पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे.तर ५१ कोटी २८ लक्ष ९७ हजार रुपये रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. ईवायसी करणे बाकी असलेल्या शेतकऱ्यांची संख्या ४७ हजार ८६० इतकी आहे.

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांची देखील हानी झाली आहे.यामध्ये २२१ रस्त्यांचे नुकसान अंदाजे १२,७६० लाख रुपयांचे आहे.१४६ पूल बाधित झाले असून अंदाजे ८ कोटी ६३ लाख रुपयांचे नुकसान तर १९ तलावांचे नुकसान झाले असून नुकसानीची किंमत अंदाजे ३ कोटी ८ लाख रुपये इतकी आहे.२,३९८ विजेच्या खांबाचे नुकसान झाले असून नुकसानीची किंमत ६ कोटी ३५ लाख रुपये इतकी आहे.जि.प. पंचायत समिती व सार्वजनिक विभागाच्या ५१ इमारतींचे नुकसान झाले आहे.इतर नुकसानग्रस्त इमारतींची संख्या २९० इतकी आहे.

१४ ते २६ सप्टेंबर दरम्यान झालेल्या पुरामुळे जिल्ह्यात तब्बल १ हजार ६८३ विहिरींचे नुकसान झाले आहे. यामध्ये भूम (८४०) व परंडा (६३६) तालुके सर्वाधिक बाधित झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जगण्याचा आधार असलेल्या विहिरी मोठ्या प्रमाणात क्षतीग्रस्त झाल्याने सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला आहे.

पूर परिस्थितीत जिल्हा प्रशासनाने मोठ्या प्रमाणात बचाव मोहीम राबवली.या मोहिमेतून ३ हजार ९५७ नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.३९३७ नागरिक स्वतःच्या घरात/नातेवाईकांकडे परतले असून २० नागरिक अद्याप निवारागृहात आहेत.पशुधनासाठी जिल्हा पशुसंवर्धन विभागाकडे मुरघास उपलब्ध असून त्याचे वाटप सुरू आहे.या आपत्तीमुळे जिल्ह्यातील शेतकरी,कुटुंबे आणि सर्वसामान्यांचे जीवन उद्ध्वस्त झाले असले तरी जिल्हा प्रशासनाकडून मदतकार्य युद्धपातळीवर सुरु आहे.

## प्रदेश भाजपा किसान मोर्चाच्या वतीने
## अतिवृष्टी बाधीत शेतकऱ्यांना चाऱ्याची मदत



धाराशिव (प्रतिनिधी)- भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे व पुणे येथील पैलवान विश्वनाथराव भेगडे सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून धाराशिव भूम परंडा व माढा अशा भागातील अतिवृष्टी बाधीत शेतकऱ्यांच्या पशुधनाला तीन मालट्रक भरून चार्याचे वितरण करण्यात आले आहे याबाबत भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेश सचिव रामदास कोळगे यांनी माहिती दिली. धाराशिव व सोलापूर जिल्हयातील बहुतांश भागातील शेतकऱ्यांची अवस्था अतिवृष्टीमुळे दयनीय झालेली आहे पशुधन शेतकरी शेतकऱ्यांची पिके संपून गेली असल्यामुळे शेतकऱ्याकडे कसल्याही प्रकारचा आधार उरलेला नसताना त्यात फुल नाही फुलाची पाकळी म्हणून महाराष्ट्र भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे अध्यक्ष गणेश भेगडे यांनी सुका चाऱ्याचे तीन ट्रक पाठवून गोरगरीब आढले नडले शेतकऱ्यांना एक मदतीचा हात त्यांनी पुढे केला आहे शासनाच्या वतीने शासन शेतकऱ्यांना मदत करत आहे पण आपण पक्षाच्याही माध्यमातून काहीतरी मदत करावी म्हणून श्री भेगडे यांनी ही मदत पाठवली आहे शेतकऱ्यांना चाऱ्याचे वितरण धाराशिव तालुक्यातील वाघोली ईर्ला दाऊतपूर येथील शेतकऱ्यांना करण्यात आले

यावेळी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेश सचिन तथा माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास कोळगे किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस तानाजी पाटील किसान मोर्चा धाराशिव तालुकाध्यक्ष तथा पंचायत समितीचे माजी सभापती नानासाहेब कदम भारतीय जनता पार्टी जिल्हा सरचिटणीस तथा पंचायत समिती माजी उपसभापती प्रदीप शिंदे पंचायत समिती माजी सभापती ओमप्रकाश मगर किसान मोर्चाचे नेते भास्कर बोंदर सतीश फडके अभिजीत रोंधवे ड निखिल शेंडगे ह भ प आकाश महाराज मगर ईर्ला येथील सरपंच अण्णा पाटील महादेव साळुंखे धर्मराज पाटील दाऊतपूर येथील दशरथ नरटे इत्यादीसह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पूरग्रस्त पशुपालकांना दिलासा
## चारा, औषधे व मदतीचा हात




धाराशिव (जिमाका) -अलीकडील पुरामुळे जिल्ह्यातील पशुपालकांचे मोठे नुकसान झाले असले तरी शासन व विविध स्वयंसेवी संस्था एकत्र येऊन संकटग्रस्तांना दिलासा देण्यासाठी पुढे सरसावल्या आहेत.पशुपालकांना मदत व्हावी यासाठी चारा,औषधे,क्षार मिश्रण व आर्थिक मदत तत्परतेने पुरवली जात आहे.

परांडा, भूम व वाशी तालुक्यात आतापर्यंत १९.५ टन मुरघास वाटप करण्यात आले असून,आज आणखी २३ टन मुरघास शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी उपलब्ध करून दिला जात आहे.बायफ संस्थेमार्फत तेर, रामवाडी,हिंगळजवाडी व म्होतरवाडी येथे मोफत १०० किलो क्षार मिश्रण देण्यात आले असून,संस्थेचा २० हजार शेतकऱ्यांसाठी लस व क्षार मिश्रण पुरवठ्याचा संकल्प आहे.

मुंबई व्हेटरनरी ल्युमिनी या संस्थेने परांडा तालुक्यातील शेलगाव दत्तक घेऊन पशुसंवर्धनासाठी विशेष उपाययोजना सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच वॉटरशेड फाउंडेशनकडून चारा, औषधे व लसी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.याशिवाय राजाराम पाटील, कोल्हापूर एम.आर.यांच्याकडून व्हेटरनरी औषधे पुरवली जात आहेत,तर भारतीय किसान संघाच्या वतीने परांडा तालुक्यात अडीच टन चारा वाटप करण्यात आला असून ५ हजार होमिओपॅथिक किटचे वितरण होणार आहे.

दरम्यान,जिल्ह्यात एकूण ४०६ जनावरांचा मृत्यू झाला असून यात २८५ मोठी व ९४ लहान दुधाळ जनावरे,तर २३ मोठी व ४ लहान ओढकाम करणारी जनावरे समाविष्ट आहेत.या हानीची भरपाई म्हणून महसूल विभागामार्फत ४६.४९ लाख रुपयांचा निधी पीडित पशुपालकांना वितरीत करण्यात आला आहे.

पूरग्रस्त पशुपालकांना अन्नधान्याबरोबरच त्यांच्या जनावरांच्या आरोग्याचीही काळजी घेणारी ही मदत हळूहळू त्यांना सावरत आहे.संकटाच्या काळात मिळालेल्या या सहकार्यामुळे पशुपालकांचा आत्मविश्वास पुन्हा दृढ होत असल्याचे चित्र गावोगावी पाहायला मिळत आहे.

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी स्वयंसेवी संस्थाचा हातभार



धाराशिव (जिमाका) :जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि पुरामुळे उभ्या राहिलेल्या संकटाच्या काळात शासकीय मदतीबरोबरच अनेक स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्ती पूरग्रस्तांच्या मदतीला धावल्या आहेत.विविध पुराने बाधित गावांमध्ये अन्नधान्य,किराणा साहित्य,पशुखाद्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले आहे.

धाराशिव तालुक्यातील भंडारवाडी,इर्ला व तेर येथे ज्ञानप्रबोधिनी (हराळे) संस्थेकडून ११६ किट वाटप झाले.पाडोळी येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून ४५ किट वाटप करण्यात आले.तर बायफ संस्थेने १०० पशुपालकांना जनावरांसाठी खनिज मिश्रण दिले.

पूरामुळे बाधित भूम तालुक्यातील झालेल्या ३२ गावांना पुण्यातील मराठवाडा युवा मंच संस्थेने ३५० किट दिली.तसेच श्रीदत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना,शिरोळ यांचेकडून ३०० किट पुरवण्यात आल्या.

परंडा तालुक्यातील २५ गावांना पंधरा स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्तींकडून तब्बल ३३,०४४ किलो अन्नधान्याचे वाटप झाले. याशिवाय आ.प्रा.डॉ.तानाजी सावंत यांनी चिंचपूर,पांढरेवाडी,रोहकल, हिंगणगाव,भोत्रा,ढगपिंपरी,शेलगाव व लोहारा या गावांमध्ये किराणा साहित्याचे किट वाटप केले.

वाशी तालुक्यातील जानकापुर गावात स्वयंसेवी संस्थेकडून धान्यकिटचे वाटप करण्यात आले.पूरग्रस्तांच्या मदतीसाठी शासनासोबतच समाजातील विविध संस्था आणि व्यक्ती पुढे येत असल्याने पुरबधित कुटुंबाना दिलासा मिळत आहे.

## अवसायनातील सहकारी संस्थांची अंतिम सभा २८ नोव्हेंबर २५ ला

धाराशिव,दि.३० सप्टेंबर (जिमाका) सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, धाराशिव यांनी दिलेल्या माहितीनुसार,महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२(२) अन्वये अवसायनात घेतलेल्या काही सहकारी संस्थांच्या अवसायन कामकाजासाठी अवसायकाची नेमणूक करण्यात आली आहे. नियम ८९(४) अन्वये संबंधित संस्थांचे सभासद,धनको व ऋणको यांनी संस्थेकडून त्यांचे येणे अथवा देणे,तसेच प्लॉट/सदनिका संदर्भातील कोणतेही म्हणणे अथवा आक्षेप १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत संबंधित अवसायकाकडे दाखल करावेत,असे आवाहन करण्यात आले आहे. यानंतर २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांच्या कार्यालयात संस्थांची अंतिम सभा घेण्यात येणार आहे.

सदर कालावधीत सभासदांकडून कोणतेही आक्षेप अथवा दावे प्राप्त न झाल्यास,अवसायनाची कार्यवाही पूर्ण करून संस्थेची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया हाती घेतली जाईल,असे सहाय्यक निबंधक एम.आर.अंबिलपुरे यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महात्मा गांधीजींचे स्वप्न साकार करा

२ ऑक्टोंबर म्हटले की, महात्मा गांधीजी यांची जयंती आठवते. यावेळी याच दिवशी दसरा सण आला आहे. 'दसरा सण मोठा नाही आनंदाला तोटा' तसे पाहिले तर भारत भूमीने अनेक थोर संत, महात्मे आणि राष्ट्रपुरुष घडविले. त्यापैकी मोहनदास करमचंद गांधी म्हणजेच महात्मा गांधी यांचे नाव विशेष आदराने घेतले जाते. सत्य, अहिंसा, नैतिकता आणि स्वराज्य या त्यांच्या विचारसरणीने केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला मार्गदर्शन केले. गांधीजींचे जीवन म्हणजे एका साध्या व्यक्तीने केलेला असामान्य संघर्ष होय. त्यांनी मांडलेले विचार व त्यांनी पाहिलेले भारताचे स्वप्न आजही तितकेच महत्त्वाचे आणि प्रेरणादायी आहे. गांधीजींनी जीवनभर सत्याला देव मानले. कोणत्याही परिस्थितीत खरे बोलणे, खरे आचरण करणे आणि स्वतःची चूक मान्य करण्याची तयारी ठेवणे हे त्यांनी शिकवले. त्यांच्या संपूर्ण राजकारणाची पायाभरणी अहिंसेवर झाली होती. अहिंसा म्हणजे फक्त मारहाण न करणे नाही, तर मन, वचन आणि कर्माने कुणालाही दुःख न पोहोचवणे. दांडीमार्च, भारत छोडो आंदोलन, सत्याग्रह यासारख्या चळवळींमध्ये त्यांनी अहिंसेचे शस्त्र वापरले. अन्यायाविरुद्ध शांततेने, अहिंसेने पण ठामपणे लढा देणे म्हणजे सत्याग्रह हे सुत्र आचणात आणले. दक्षिण आफ्रिकेतून त्यांनी ही पद्धत विकसित केली आणि नंतर भारतात मोठ्या प्रमाणावर वापरली. गांधीजींच्या मते भारताचे स्वातंत्र्य हे आर्थिक स्वावलंबनात दडलेले आहे. त्यांनी चरखा, खादी, स्वदेशी वस्तू यांचा जीवनभर प्रचार केला. स्वदेशीचा स्वीकार आणि परकीय वस्तूंचा बहिष्कार हा त्यांचा आर्थिक स्वावलंबनाचा मंत्र होता. गांधीजींनी आयुष्यभर साध्या खादीच्या वस्त्रांचा स्वीकार केला. सत्तेत असूनही त्यांनी नेहमी साधेपणाने जगले. साधेपणामुळेच त्यांचा संदेश अधिक प्रभावी ठरला. अस्पृश्यता निर्मूलन, स्त्रीशिक्षण, ग्रामविकास, दारूबंदी अशा अनेक क्षेत्रांत गांधीजींनी समाजाला दिशा दिली. त्यांचे मत होते की, भारत खऱ्या अर्थाने मजबूत होणार तर गावागावातल्या सामान्य माणसाचे जीवनमान उंचावले पाहिजे. त्यांचे अंतिम स्वप्न म्हणजे ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त असा भारत होय. पण केवळ राजकीय स्वातंत्र्य नव्हे, तर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वराज्य त्यांना अपेक्षित होते. त्यांच्या मते प्रत्येक गावाने स्वयंपूर्ण असले पाहिजे. शेती, उद्योग, शिक्षण, स्वच्छता या बाबतीत स्वतंत्र असले पाहिजे. सर्व समाजघटक समान हक्कांनी जगतील हेच त्यांचे स्वप्न होते. गांधीजींनी पाहिलेले भारताचे स्वप्न हिंसेशिवाय मजबूत असलेले राष्ट्र होते. आंतरराष्ट्रीय वादही शांततेतून आणि संवादातून सोडवावेत असे त्यांचे मत होते. स्त्रियांचा समाजात व राष्ट्रनिर्मितीत समान सहभाग असावा असे गांधीजींचे स्वप्न होते. त्यांनी स्त्रियांना चळवळीत मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेतले. त्यांच्या दृष्टीने राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून धर्माधारित, नैतिकतेवर आधारलेले असले पाहिजे. भ्रष्टाचारमुक्त भारत हे त्यांचे महत्वाचे स्वप्न होते ते आजही अपूरे राहील्याचे जाणवत आहे. आजच्या काळातील गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता असून आज हिंसाचार, दहशतवाद, भ्रष्टाचार, विषमता वाढत असताना गांधीजींचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. पर्यावरणस्नेही विकास, टिकाऊ अर्थव्यवस्था, ग्रामविकास या संकल्पना गांधीजींनी शंभर वर्षांपूर्वी मांडल्या होत्या. जागतिक स्तरावर मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला यांसारख्या नेत्यांनी गांधीजींच्या विचारांवर चालून जनचळवळी यशस्वी केल्या. महात्मा गांधींचे विचार आणि स्वप्ने ही भारताच्या आत्म्याशी घट्ट जोडलेली आहेत. स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ लोटला असला तरी त्यांची शिकवण आजही तितकीच जिवंत आणि उपयुक्त आहे. गांधीजींचे जीवन म्हणजे सत्य, अहिंसा, साधेपणा, स्वदेशी आणि नैतिकतेचे मूर्तिमंत उदाहरण. त्यांनी पाहिलेला भारत अजून पूर्णतः साकार झाला नाही, पण त्या दिशेने चालण्यासाठी त्यांचे विचारच आपल्याला दिशा देऊ शकतात. भारताला महात्मा गांधीजींच्या विचाराची देन आहे. जगात महात्माजींना ओळखतात, त्यांचे पुतळे अनेक ठिकाणी आहेत. मुळात आपल्या देशात अहिंसचा प्रचार मोठ्या प्रमाणात झाला. समनतेची शिकवण बरोबर त्यांनी देशात दारूबंदी व्हावी हे स्वप्न होते, ते आजही पंच्याहत्तरवर्ष झाली तरी अपूरेच राहीले आहे. ते जर सत्यात खरे ठरले तर भारता एवढी बलवान पिढी जागत दिसणार नाही. अनेक महात्माजींचे कार्यक्रम राबविले जातात. परंतु दारूबंदी होऊ शकली नाही. त्याच प्रमाणे समानता निर्माण होवू शकली नाही. त्यांनी खरा भारत हा ग्रामीण भागात वसलेला आहे. त्यामुळे ग्रामीण भागाकडे लक्ष दिले पाहिजे. ग्रामीण भागातील कुटीर उद्योगाला चालना दिली पाहिजे. जो पर्यंत खेडी सुधारणार नाहीत, विकास होणार नाही तो पर्यंत देशाचा प्रामुख्याने विकास होणार नाही हे त्यांनी ओळखले होते. त्यानुसार त्यांनी संदेश दिला होता. गावांचे स्वराज्य, जातिभेदविरहित समाज, अहिंसेवर आधारलेले राष्ट्र, स्वदेशीवर आधारित अर्थव्यवस्था, दारूबंदी आणि नैतिकता हे गुण जीवनात उतरावे लागेल. त्याच प्रमाणे महात्मा गांधीजी यांच्याकडून काही चुका घडल्या आहेत. त्या जर घडल्या नसत्या तर यापेक्षा अधिक लोकांनी मानले असते. महात्माजीमुळे आपले भले झाले याचा विचार शेजारी राष्ट्र करीत नाहीत. मुळात त्यांना एकोपा हवा होता. बंधुभाव हवा होता. केवळ स्वार्थी मंडळींनी त्यांचा उपयोग करून घेतला. त्यांनी जर पहिले पंतप्रधान लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांना मान्यता दिली असती तर आज देशात जी काही बाबतीत वाईट स्थिती दिसून येते ती दिसली नसती. पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे विचार वेगळे होते. देशात आज चांगले विचार महात्माजीकडून घेतले पाहिजे. खादीचा व स्वदेशींचा वापर केला पाहिजे. अनेकजन महात्माजींचे पाईक मानतात. जनता ही दैवत मानत होती. तसे आजच्या नेत्यांनी मानले पाहिजे तसे गुण अंगी उतरले पाहिजे. महात्माजींचे जीवनाचा आदर्श घेतला पाहिजे. महात्माजींचे जीवनच आदर्शवादी होते. त्यांचा संदेश दिला तो प्रत्येकांनी आचरणार आणला पाहिजे. तरच जीवन सुखकर होईल. त्यांची जयंतीदिनी आपल्यात त्याचे जीवनच उतरण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

# लातूर शहर महानगरपालिकेच्यावतीने प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजने अंतर्गत लोक कल्याण मेळावा संपन्न

## शहरातील पथविक्रेत्यांना लाभदायक – आयुक्त मानसी, लातूर







**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेची पुनर्रचना करून सदर योजनेला माहे मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे शहरातील फेरीवाले, छोटे व्यावसायिक यांना याचा लाभ होणार आहे. आयुक्त मानसी यांच्या आदेशानुसार व उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनानुसार सदर योजने अंतर्गत दिनांक १७ सप्टेंबर ते दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत " लोक कल्याण मेळावा" आयोजित करण्याबाबत शासनाच्या सूचना होत्या. यात नवीन कर्ज प्रस्ताव स्वीकारणे, प्रस्ताव मंजूर करणे, वाटप करणे, फेरीवाले यांचे डिजिटल ओंनबोर्डिंग करणे, फेरीवाले यांचे स्ट्रीट फूड फेरीवाले यांचेसाठी प्रशिक्षण आयोजित करणे हे कामे करण्यात आली.

याचाच एक भाग म्हणून दिनांक २९ सप्टेंबर २०२५ शहरातील खाद्य पदार्थ विक्री करणारे पथ विक्रेते यांचेसाठी अन्न सुरक्षा याबाबत भालचंद्र ब्लड बँक सभागृहात प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाचे उद्घाटन उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थित सर्व पथ विक्रेते यांना सदर प्रशिक्षण खाद्य पदार्थ विक्री करताना महत्वाचे असल्याचे सांगून योजनेत कर्ज मर्यादा मध्ये सुधारणा झाली असून आता नवीन पहिले कर्ज १०००० /- रु. वरून १५०००/- रु. , दुसरे कर्ज मर्यादा २००००/- रु. वरून २५०००/- रु. , इतकी वाढविण्यात आली असून तिसरे कर्ज ५००००/- रु. असणार आहे असे असणार असून त्याचा लाभ घ्यावा. याशिवाय योजनेचा लाभ घेणारे ज्यांनी दुसरे कर्ज वेळेवर नियमितपणे परतफेड केली आहे अशा लाभार्थ्यांना क्रेडीट कार्ड दिले जाणार आहे. त्यामुळे अचानक उद्भवणाऱ्या व्यवसाय व वैयक्तिक अडचणीसाठी तात्काळ आर्थिक मदत मिळू शकेल, असे सांगितले. अन्न व भेसळ प्रतिबंधक कार्यालयाचे प्रशिक्षक योगेश वंजारे यांनी उपस्थिताना सदर प्रशिक्षण चांगल्याप्रकारे दिले. यात त्यांनी प्रत्येक पथ विक्रेते यांनी व्यवसाय करताना काळजी घ्यावी व शासनाच्या सूचनांचे वेळोवेळी पालन करावे असे सांगितले.

त्याचप्रमाणे आज दिनांक ३०/०९/२०२५ रोजी भालचंद्र ब्लड बँक सभागृहात लोक कल्याण मेळावा घेण्यात आला. यासाठी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राहुल आठवले, स्टेट बँक ऑफ ;/इंडियाचे उप शाखा व्यवस्थापक रुपेश खोत, रवींद्र तोगरे, युनियन बँक ऑफ इंडिया चे कर्ज अधिकारी भगवान शिंदे हे उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राहुल आठवले यांनी पथ विक्रेते यांनी मिळालेले कर्ज वेळेत भरणा करावा , थकीत राहणार नाही याची काळजी घ्यावी आणि नियमितपणे कर्जाची परतफेड केल्यास त्यांना बँक पुढील कर्ज देऊ शकते. तरी सर्वांनी या कर्ज योजनेचा लाभ घ्यावा व यासाठी सर्व बँका सहकार्य करतील असे सांगितले.

तसेच सदर मेळावा यशस्वी करण्यासाठी यावेळी समुदाय संघटक वीरेंद्र सातपुते, समूह संसाधन व्यक्ती शामल भालेराव, नीता भालेकर, अनिता पवार , शीतल गोरे, ज्योती सोनकांबळे, घटना सातपुते, लोमावती मुळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर अभियान व्यवस्थापक नितीन सुरवसे यांनी केले तर आभार शहर अभियान व्यवस्थापक लक्ष्मण जाधव यांनी मानले.

तरी या लोक कल्याण मेळाव्यामुळे शहरातील फेरीवाले यांना याचा लाभ झालेला असून शहरातील अजून जास्तीत जास्त्र पात्र फेरीवाले यांनी या सुधारित कर्ज योजनेचा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त मानसी यांनी केले आहे.

# नागरिकांनी शासकीय दवाखान्यात उपचार घ्यावेत : डॉ. दिनकर पाटील




**निलंगा/आयुब बागवान– :** नागरिकांनी आजार उद्भवल्यास तो आजार लपवून किंवा आजाराकडे दुर्लक्ष करून घरी बसून आपले आरोग्य धोक्यात घालू नका महाराष्ट्र सरकारकडून सर्व सुविधांनी सुसज्ज असे सरकारी दवाखाने निर्माण करण्यात आले असून निलंगा येथीलही उपजिल्हा रुग्णालयात सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध असून सर्व आजारावर मोफत उपचार देण्यात येतात.

यासाठी येथे अनेक तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्यात आली आहे.येथे तज्ञ डॉक्टरांचा संच सेवेमध्ये कार्यरत आहे. त्यामुळे नागरिकांनी आता स्वतः पुढाकार घेऊन आपल्या परिवारात अथवा आपल्या मित्र परिवारातील कोणीही आजारी असल्यास घाबरून न जाता सरकारी रुग्णालयात दाखल करावे व आपला आजार बरा करून सुखी जीवन जगावे असे आवाहनही डॉ. दिनकर पाटील यांनी केले.

ते निलंगा उपजिल्हा रुग्णालयात आयोजित करण्यात आलेल्या अंतरराष्ट्रीय जेष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

या कार्यक्रमास डॉ. पिसाळ, गोविंद सुर्यवंशी, पत्रकार मिलिंद कांबळे, कोकाटे सिस्टर, मोनिका पांढरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. पाटील पुढे म्हणाले की, ३० तीस वर्षाच्या पुढील नागरिकांनी आपल्या शरीराच्या सर्व तपासण्या करून घेऊन उद्भवणाऱ्या आजारावर उपचार करून चांगले जीवन जगावे असे आवाहनही डॉक्टर पाटील यांनी यावेळी केले या कार्यक्रमास निलंगा शहर व तालुक्यातील जेष्ठ नागरिक व उपचार कामी आलेले महिला पुरुष उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले...

# इंग्लिश मिडियम शाळेत दांडिया महोत्सव उत्साहात





**उमरगा/आयुब बागवान :** येथील डॉ. के डी शेंडगे इंग्लिश मिडियम शाळेत दांडिया महोत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. या महोत्सवामध्ये लहान मुलांनी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये उत्साहाने भाग घेतला.

या महोत्सवांतर्गत डान्स स्पर्धा, ड्रेसिंग, दांडिया अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपली कला सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

विशेषतः ड्रेसिंग व डान्स स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कलाकृती व नृत्य सादर केले. या स्पर्धेत काशिफा सोहेल सौदागर यांनी पहिला क्रमांक मिळवला काशिफा सोहेल सौदागरयाला प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला उमरगा तील समाजसेविका शिवाई किरण गायकवाड, मलशेट्टी मुख्यदापक उपस्थित होत्या. त्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे संस्थापक, प्राचार्य व शिक्षकवर्ग यांचे विशेष योगदान लाभले.

# अहिंसा : भारतीय तत्वज्ञानाची मानवतेला दिलेली शाश्वत देणगी

मानवजातीच्या उत्क्रांतीचा इतिहास पाहिला तर त्यात वैचारिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय अशा विविध प्रवाहांची सतत धारा वाहताना दिसते. या प्रवाहांनी मानवाला कधी संघर्ष दिला, कधी विकासाची संधी दिली, तर कधी त्याला अधःपतनाच्या मार्गावर नेले. परंतु या साऱ्या गोंधळातही काही शाश्वत मूल्ये अशी आहेत की त्यांनी मानवतेला टिकवून ठेवले, जीवनाला अर्थ दिला आणि समाजाला योग्य दिशा दिली. या मूल्यांमध्ये अहिंसा हे भारतीय तत्त्वज्ञानाचे जगाला आणि मानवतेला दिलेली सर्वांत मोठी शाश्वत देणगी आहे. हिंसेच्या आगीमध्ये जळणाऱ्या मानवतेला अहिंसा हा शीतल झरा आहे. म्हणूनच २ ऑक्टोबर हा दिवस, जो महात्मा गांधींच्या जन्मदिनानिमित्त 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरा केला जातो, तो केवळ गांधीजींच्या स्मृतीपुरता मर्यादित नसून भारतीय विचारसंपदेच्या गौरवाचे प्रतीक आहे.



अहिंसेची कल्पना भारतात नवी नाही. 'अहिंसा परमो धर्मः' हा विचार लोकांच्या आचार-विचारात रूजलेला होता. पण अहिंसेला सर्वाधिक सुस्पष्ट रूप आणि दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनविले ते बौद्ध आणि जैन तत्त्वज्ञानाने. या दोन परंपरांनी अहिंसेला केवळ धार्मिक उपदेश न ठेवता ती सामाजिक, नैतिक आणि वैयक्तिक जीवनाच्या प्रत्येक पातळीवर आचरणात आणली आहे. भगवान बुद्धांनी करुणा, मैत्रीभावना आणि समत्व यांच्या माध्यमातून अहिंसेला मानवी जीवनाचा पाया बनविला, तर भगवान महावीरांनी अहिंसेला सर्वोच्च व्रत मानले. त्यामुळे भारताची ही देणगी केवळ एका देशापुरती मर्यादित राहिली नाही, तर तिने संपूर्ण जगाच्या वैचारिक इतिहासाला घडविले.

भगवान गौतम बुद्धांच्या शिकवणीत अहिंसेला करुणा आणि मैत्रीभावनेच्या माध्यमातून केंद्रस्थानी ठेवण्यात आले. बुद्धांनी मानवी जीवनातील दुःखाचे मूळ अज्ञान, लोभ आणि द्वेषात शोधले. त्यांनी सांगितले की प्रत्येक जीव दुःख टाळण्याची इच्छा करतो; त्यामुळे कोणत्याही जीवाला दुःख देणे ही सर्वांत मोठी हिंसा आहे. बुद्धांच्या पंचशीलांमध्ये पहिला नियम किंवा शील आहे ते म्हणजे 'प्राण्यांचा जीव घेणार नाही'. हा नियम केवळ हत्या न करण्यापुरता मर्यादित नाही, तर इतरांना त्रास देणार नाही, शोषण करणार नाही, दास्य स्वीकारणार नाही, असेही त्याचे व्यापक स्वरूप आहे.

बुद्धांच्या अष्टांगिक मार्गात सम्यक दृष्टी, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका ही सर्व अंग अहिंसेशी थेट जोडलेली आहेत. खोटे बोलणे, कटु वाणी वापरणे, परनिंदा करणे, लोभ, मत्सर, क्रोध या सर्व मानसिक हिंसा आहेत. त्यामुळे बुद्धांनी मन, वाणी आणि कृती या तिन्ही स्तरांवर करुणा आणि मैत्री विकसित करण्यावर भर दिला. बौद्ध परंपरेतील 'मैत्रीभावना ध्यान' म्हणजे अहिंसेचेच एक सुंदर व्यावहारिक रूप आहे. या ध्यानात साधक स्वतःसाठी आणि सर्व प्राणिमात्रांसाठी शुभेच्छा व्यक्त करतो 'सर्व प्राणी सुखी होवोत, सर्व प्राणी निरोगी राहोत, सर्व प्राणी शांततेत नांदोत'. या प्रक्रियेतून मनातील द्वेष, राग, मत्सर नाहीसे होऊन करुणा, प्रेम आणि सहजीवनभाव निर्माण होतो.

बुद्धांच्या शिकवणीचा समाजावर फार मोठा परिणाम झाला. त्याकाळी प्रचलित असलेल्या प्राण्यांच्या बलिदानांच्या प्रथा, जातीभेद, दास्यप्रथा यावर मोठ्या प्रमाणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. आशियातील चीन, जपान, श्रीलंका, थायलंड, कोरिया या देशांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला आणि त्यासोबतच अहिंसेचा विचारही सर्वत्र रुजला. त्यामुळे अहिंसा ही केवळ भारतीय मूल्य न राहता संपूर्ण आशियाई संस्कृतीचा आधारस्तंभ ठरली.

तसेच जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांनी अहिंसेला जीवनाचा केंद्रबिंदू मानला. त्यांच्या मते प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येक आत्मा शुद्ध, शाश्वत व समान आहे. त्यामुळे कोणत्याही जीवाला दुखविणे म्हणजे स्वतःच्या आत्म्यावरच आघात करणे होय. महावीरांनी पाच महान व्रते सांगितली अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. यामध्ये अहिंसा हे सर्वोच्च व्रत मानले जाते, कारण त्याशिवाय इतर व्रतांचे अस्तित्वच अशक्य आहे. जैन आचारसंहितेनुसार अहिंसा केवळ हत्या टाळणे एवढीच मर्यादित नाही, तर ती विचार, वाणी आणि कृती या तिन्ही स्तरांवर आचरली जाणारी संपूर्ण जीवनपद्धती आहे.

जैन साधू-साध्वींनी आचरलेली अहिंसा इतकी सूक्ष्म आहे की ती पाहून जग थक्क होते. चालताना एखादा कीटक चिरडला जाणार नाही याची दक्षता घेणे, पाणी गाळून पिणे, रात्री न चालणे, जमिनीवर बसताना सूक्ष्म जीवांना इजा होणार नाही यासाठी पायाखाली कापड पसरवणे ही त्यांच्या जीवनातील वास्तव उदाहरणे आहेत. इतकेच नव्हे तर ते वाणीतील कटुता, विचारांतील वैरभाव यांनाही हिंसा मानतात. गृहस्थांसाठीही महावीरांनी अहिंसेचा उपदेश केला. जाणूनबुजून कोणत्याही सजीवाला त्रास न देणे, व्यापारात फसवणूक न करणे, इतरांच्या संपत्तीवर डोळा न ठेवणे, कुटुंबात संयम व करुणा पाळणे ही गृहस्थांची अहिंसा ठरते.

जैन तत्त्वज्ञानाद्वारे अहिंसेच्या वैचारिक विस्ताराचे दर्शन घडवतात. सत्य एकांगी नसते; ते विविध दृष्टीकोनांतून समजावे लागते. त्यामुळे इतरांचा विचार नाकारणे, त्यांना चुकीचे ठरविणे, आपलेच सत्य अंतिम मानणे ही एक प्रकारची मानसिक हिंसा ठरते. तसेच प्रत्येक विधान सापेक्ष आहे, ते 'अमुकदृष्ट्या सत्य' असते. त्यामुळे वादविवादात अडेलतट्टूपणा टाळून संवाद साधणे, परस्पर सहिष्णुता बाळगणे हेही अहिंसेचेच रूप आहे. अशा प्रकारे जैन परंपरेने अहिंसेला जीवनाच्या प्रत्येक अंगात विस्तार दिला.

या दीर्घ परंपरेला आधुनिक काळात नवे परिमाण दिले ते महात्मा गांधींनी. गांधीजींनी अहिंसेला केवळ वैयक्तिक चारित्र्याची गोष्ट न मानता सामाजिक व राजकीय संघर्षाचे प्रभावी साधन बनवले. त्यांनी सांगितले की सत्यासाठी लढताना अहिंसा हाच सर्वोत्तम मार्ग आहे. ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लढताना महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाच्या माध्यमातून अहिंसेचा उपयोग केला. त्यांनी दाखवून दिले की शस्त्र न उचलता देखील साम्राज्याला गुडघे टेकवता येतात. महात्मा गांधीजींच्या या प्रयोगाने जगातील अनेक नेत्यांना प्रेरणा दिली. मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला, दलाई लामा यांसारख्या नेत्यांनी अहिंसेच्या मार्गाने सामाजिक परिवर्तन घडवून आणले. संयुक्त राष्ट्रसंघाने महात्मा गांधीजींच्या जन्मदिनी म्हणजेच २ ऑक्टोबर रोजी, 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' घोषित करून या भारतीय विचारधारेचे जागतिक महत्त्व अधोरेखित केले.

आजच्या युगात अहिंसेचे महत्त्व अधिकच वाढले आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाला अवकाशाचा वेध घेता आला, संगणक व कृत्रिम बुद्धिमत्ता निर्माण करता आली, पण त्याचबरोबर युद्ध, दहशतवाद, अण्वस्त्रांची शर्यत, पर्यावरणाचा ऱ्हास, सामाजिक असमानता यांसारख्या समस्या अधिकच तीव्र झाल्या. मानवी लोभामुळे पृथ्वीचे संतुलन धोक्यात आले आहे. हिंसा केवळ रणांगणावर नव्हे तर विचारांमध्ये, वाणीमध्ये आणि समाजरचनेतही वाढताना दिसते. अशा वेळी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाची देणगी असलेली अहिंसा हीच मानवतेचा खरा आधार ठरते. अहिंसा म्हणजे केवळ युद्ध टाळणे नाही, तर अहिंसा म्हणजे पर्यावरणाचा विध्वंस न करणे, प्राण्यांवर अनावश्यक अत्याचार न करणे, महिलांवर व दुर्बलांवर होणारी हिंसा थांबवणे, जातीय, धार्मिक वा वांशिक भेदभाव दूर करणे, सामाजिक व आर्थिक अन्यायाला अहिंसात्मक मार्गाने आव्हान देणे. जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात विचार, वाणी आणि कृती या तिन्ही स्तरांवर अहिंसा पाळली, तर समाजात शांतता, प्रेम व सहजीवनाचे वातावरण निर्माण होईल.

अहिंसा ही केवळ उपदेशाची गोष्ट न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरली पाहिजे. बौद्ध आणि जैन परंपरांनी दिलेली करुणा व मैत्रीभावना, गांधीजींनी दिलेला सत्याग्रहाचा मार्ग आणि संयुक्त राष्ट्रसंघाने अहिंसेला दिलेली जागतिक मान्यता या सर्व गोष्टी आपल्याला आठवण करून देतात की अहिंसा हीच भविष्यातील मानवतेची तारणहार आहे. हिंसा विध्वंस घडवते, तर अहिंसा सृजन करते. हिंसा द्वेष वाढवते, तर अहिंसा मैत्री निर्माण करते. हिंसा मृत्यू पसरवते, तर अहिंसा जीवनाचा उत्सव साजरा करते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त आपण सर्वांनी हे स्मरण केले पाहिजे की, जर मानवतेचे भविष्य सुरक्षित, उज्ज्वल आणि शांततामय करायचे असेल, तर अहिंसा हीच जीवनपद्धती म्हणून स्वीकारावी लागेल. हे केवळ भारताचेच नव्हे तर संपूर्ण जगाचे कर्तव्य आहे. अहिंसा ही भारतीय तत्त्वज्ञानाची मानवतेला दिलेली शाश्वत देणगी आहे आणि हीच देणगी आपल्याला उज्ज्वल उद्याच्या दिशेने नेणारी आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२

# राष्ट्र सर्वतोपरी



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला आज शंभर वर्षं पूर्ण होत आहेत. राष्ट्रीय चरित्र निर्माण, सामाजिक आणि सांस्कृतिक जागरूकता आणि समाजातील सर्वात शेवटच्या पायरीवरील माणसाचे पुनरूत्थान या मार्गावर शंभर वर्षं काम केले आणि अजूनही तो काम करतोच आहे. आज देशभरात संघाच्या ५५ हजार शाखा आ- हेत आणि कोणत्याही राजकीय वादात न पडण्याची त्यांची भूमिका आजपर्यंत राहिली आहे. भारतीय जनता पक्ष या पक्षाचा तो पैतृक आहे. म्हणजे भाजपचा तो पिता आहे. पण इतक्यावरच त्याचे कार्य संपत नाही. समाजातील तळागाळातील लोकांचे कल्याण आणि सामाजिक समरसता यात संघ स्वयंसेवक स्वतःला वाहून टाकतात. गेल्या शंभर वर्षांत संघापुढे अनेक आव्हाने उभी राहिली आणि त्यातून तावूनसुलाखून पण आपले चरित्र न गमावता संघ तसाच मजबूत उभा आहे. संघाच्या कार्यशैलीवर वाद करत असतात आणि संघावर आक्रमक शैलीत टीका करत असतात. पण त्यांच्या टीकेत कधीही तथ्य आढळले नाही. संघावर पंडित नेहरूंच्या निधनानंतर त्यांच्या मृत्यूनंतर काही वर्षे बंदी आणली होती. १९४७ मध्ये एकदा आणि स्वातंत्र्योत्तर काळात संघावर तीन वेळा बंदी घालण्यात आली होती. कारण काँग्रेस सरकारला संघ नकोसा वाटत होता. संघावर नेहरूंपासून ते गांधी परिवारापर्यंत अनेकांनी फॅसिस्ट संघटना असे अनेक आरोप केले आहेत. पण काँग्रेसच्या त्या दाव्यांना कधीही सिद्ध करण्यात आले नाही आणि 'हाथी चले अपनी चाल'प्रमाणे संघ वाटचाल करतच राहिला. नथुराम गोडसे याने जेव्हा महात्मा गांधी यांची हत्या केली तेव्हा संघावर भारतीय सरकारने प्रथम बंदी आणली होती. नंतर इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात काँग्रेस सरकारने संघावर बंदी आणली. पण संघावर कोणताच आरोप कधीही सिद्ध झाला नाही. भारतातील अल्पसंख्याक वर्गाला खूश करण्यासाठी काँग्रेस सरकारने संघाला नेहमीच टार्गेट केले होते. पण कधीही काँग्रेस सरकार ते सिद्ध करू शकले नाही. मध्यंतरी तर केवळ संघाशी संबंधित नाही म्हणून सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना तसे लिहून देण्याची सक्ती केली होती. काँग्रेसचा हा संघ स्वयंसेवकांबद्दलचा द्वेष यात दिसून आला. संघाच्या नेत्यांवर असा आरोप नेहमीच लावला जातो की त्यांनी आपल्या मुख्यालयात कधीही स्वातंत्र्य उत्सव साजरा केला नाही. पण तो केवळ आरोप होता. संघाने भारताचे राष्ट्रीय आणि सामाजिक अभिसरण हे कार्य सातत्याने संघाने केले आहे. संघाची स्थापना २७ सप्टेंबर १९२५ रोजी झाली आणि आज बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले आहे. पण संघाची जाज्वल्य निष्ठा आणि तळागाळातील वर्गाचे उत्थान हे कार्य अहोरात्र सुरू आहे. संघाचा सर्वात नेहमीच वाद राहिला होता तो कम्युनिस्ट पक्षांशी नंतर काँग्रेसशी. पण संघ या सर्वांना पुरून उरला आणि आज तर तो सत्ताधारी झाला आहे. म्हणजे संघाचे पदाधिकारी प्रत्यक्षात सत्तेत नसतात. पण भाजपला सत्तेत आणण्यासाठी ते प्रचंड कष्ट करतात आणि त्याचे फल त्यांना मिळते. संघावर अनेक आरोप करण्यात आले तसेच त्यांना फॅसिस्ट म्हणून हिणवण्यात आले तसेच संघाच्या स्वयंसेवकांना टार्गेट करण्यात आले. बाबरी मशिदीचे पतन असो किंवा गांधी हत्या असो. या काळात संघाला टार्गेट करून बंदी घालण्यात आली. यावेळी काँग्रेसचेच सरकार होते. पण संघाने सर्व आव्हानांना तोड देत आज आपले सर्वोच्च स्थान पटकावले आहे.

संघ आज १०० वर्षं पूर्ण करत आहे. पण त्यांची पहिली शाखा नागपूरच्या मोहितेवाडा येथे भरवण्यात आली होती. आज त्या शाखेचा वटवृक्ष झाला आहे. आज संघाच्या जगभर शाखा आहेत आणि जगभर संघाचे स्वयंसेवक आहेत, तसेच संघात प्रत्यक्ष संबंधित नसले तरीही संघाप्रती सहानुभूती बाळगणारे आहेत. शंभर वर्षांपूर्वी स्थापन झालेला संघ नेहमीच टीकेच्या केंद्रस्थानी आहे. कधी त्याला फॅसिस्ट म्हणणे, तर कधी भारताचा स्वांतंत्र्यदिन साजरा केला नाही असे म्हणणे तसेच संघावर तर काँग्रेसने हिसाचार फैलावल्याचा आर- ोपही केला होता. पण यातील एकही आरोप सिद्ध होऊ शकला नाही आणि आज दिमाखात संघ शंभरावे वर्षं साजरे करत आहे. संघावर नेहमीच आरोप केला जातो की तो ब्राह्मण्यावादी संघटना आहे. पण संघाच्या शाखेत जा, कधीही तुम्हाला जातीभेद मानलेला दिसणार नाही. उलट संघाने समरसता शिबिरे भरवून समाजातील जातिभेद दूर केले आहे. किंबहुना तसे प्रयास केले आहेत. आज जग खूप जवळ आले आहे. त्यामुळे प्रत्येक संघटनेची आ- पली एक भूमिका घेणे आवश्यक आहे. ते कार्य संघ उत्कृष्टरीत्या पार पाडतो आहे असेच म्हणावे लागेल. जागतिक संदर्भ बाजूला ठेवून संघाला भार- तापुरता विचार करून चालणार नाही आणि संघ ते करतो आहे. कारण हे ईश्वरदत्त कार्य आहे आणि ते पार पाडण्यासाठी संघ खंबीरपणे पाय रोवून उभा आहे. हेडगेवारांनी उभारलेल्या या शाखेचा एक वटवृक्ष झाला आहे आणि त्याची फळं भाजप ते संघाच्या अनेक शाखापर्यंत पोहोचली आहेत. आज शंभर वर्षांपूर्वी जग फारच बदलले आहे. अगदी शंभर वर्षांपूर्वीही जग होते तसेच ते राहिलेले नाही. महायुद्धानी जगाला बदलले तसेच आता होऊ घातलेल्या जागतिक संघर्षानेही जगापुढे नवीन आव्हानात्मक स्थिती उभी केली आहे. तिला तोंड कसे द्यायचे याचे उत्तर संघाकडेच आहे. जेव्हा संघाची स्थापना झाली तेव्हा फक्त हिंदू राष्ट्र म्हणून उभारणी करायची असे संघापुढे आव्हान होते. आज ते आव्हान कित्येक पटींनी वाढले आहे. त्यामुळे संघाची जबाबदारीही वाढली आहे. आज मितीला संघ ही प्रचंड सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळ म्हणून समोर आली. अनेक आव्हाने परतवून सत्ता स्थापन केली, ती आपल्या अपत्याला म्हणजे भाजपला सत्तास्थानापर्यंत पोहोचवले आहे. पण एवढ्यापुरते संघाचे काम संपत नाही तर यापुढे सत्ता टिकवणे आणि काँग्रेसला नेस्तनाबूत करणे हे संघापुढचे आव्हान आहे. ही लढाई कधीही संपणार नाही. शंभर वर्षे हा तिच्या प्रवासातील एक पडाव आहे. यापुढेही संघाची वाटचाल अशीच चालू राहील यात काही शंका नाही. कारण नरेंद्र मोदी यांच्यासारखे पंतप्रधान भारताला लाभले आहेत.

# मनाचं समाधान करणारी ज्ञानेश्वरी



काव्य, भाषासौष्ठव, दृष्टान्त, रसाळता आणि तत्त्वचिंतन या सर्वच भूमिकांतून ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी लोकजीवनात शिखरावर जाऊन बसला आहे. कल्पनाशक्तीची उदारता, शब्दांची समृद्धी, विचारांची श्रीमंती आणि रचनेची स्वाभाविकता व सहजता या काव्यगुणांमुळे ज्ञानदेवांनी शास्त्र सिद्धान्तालाच काव्यातून गुंफले आहे, हे ज्ञानेश्वरीचे वेगळेपण आहे आणि त्यामुळे ङ्गज्ञानेश्वरीफ मनाचं समाधान करणारी ठरते.महर्षी व्यासांच्या प्रतिभेतून साकारलेलं भगवद्गीतेत तत्त्वज्ञान! ते अत्यंत उपयोगी, अलौकिक! जगण्याला दिशा देणारं! ते माऊलींनी मराठीत आणलं ङ्गज्ञानेश्वरीफतून. त्यांची प्रतिज्ञा अशी की, ङ्गमाझे बोल निव्वळ मराठीत आहेत खरे; परंतु ते प्रतिज्ञेने अमृतालाही सहज जिंकतील अशा गोड अक्षर-रचनेने मी सांगेन.फ


**ङ्गमाझा मर्हाठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके।**
**ऐशीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥फ अध्याय ६- ओवी क्र. १४**


ही प्रतिज्ञा त्यांनी सार्थ केली. संपूर्ण ज्ञानेश्वरी अमृतमय झाली. यातील दुसऱ्या अध्यायातील अवीट गोडीचा आनंद देणाऱ्या काही ओव्या आता पाहू. रणांगणात समोर गुरू, आपले सगेसोयरे पाहून अर्जुन व्याकुळ झाला. यांच्यावर वार कसा करू? म्हणून त्याचं मन आक्रंदन करू लागलं. तो युद्धातून माघार घेऊ लागला. त्याचं वर्णन करताना ज्ञानदेव म्हणतात - ङ्गज्याप्रमाणे सूर्य ढगांनी झाकला जातो, त्याप्रमाणे अर्जुन यावेळी **भ्रमाने झाकोळून गेला.ङ्गमग देखा तेथ फाल्गुनू। घेतला असे भ्रांती कवळूनु।** जैसा घनपडळीं भानू। आच्छादिजे॥फ ओवी क्र. ७५

ङ्गफाल्गुनफ म्हणजे ङ्गअर्जुनफ होय. अर्जुनासाठी ज्ञानदेव इतकी विविध, अर्थपूर्ण संबोधनं वापरतात की तो एक खास लेखाचा विषय होईल. असो. ङ्गभ्रांती कवळुनुफ्चा अर्थ आहे ङ्गभ्रमाने व्यापलेलाफ. अर्जुनाच्या मनः स्थितीचं हे अचूक वर्णन!

अर्जुन हा खरं तर सूर्यासारखा तेजस्वी, महापराक्रमी असा योद्धा, पण सूर्य ढगांनी झाकून जावा त्याप्रमाणे अर्जुन भ्रमाने भरून गेला. हा भ्रम कोणता? तर ङ्गमीफ म्हणजे माझं शरीर होय. मी नातेवाइकांना मारणारा आहे. ते मरणारे आहेत. अर्जुनाचं हे अज्ञान, हा मोह दूर करण्यासाठी श्रीकृष्ण सिद्ध झाले आहेत.

# फिटनेस आणि स्नायूंच्या ळकटीसाठी






मुंबई: निरोगी आणि तंदुरुस्त राहायचे असेल, स्नायूंची निर्मिती करायची असेल किंवा वजन कमी करण्याचे ध्येय असेल, तर तुमच्या आह- ारात प्रोटीन (प्रथिने) असणे अत्यंत महत्त्- ाचे आहे. प्रोटीन शरीराला केवळ ताकद देत नाही, तर स्नायूंना मजबूत करण्यासाठी, खराब झालेल्या ऊतींची दुरुस्ती करण्यासाठी आणि हाडे व त्वचेला निरोगी ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. प्रोटीन (प्रथिने) तुमच्या शरीरासाठी का आवश्यक आहेत? स्नायूंची वाढ आणि दुरुस्ती: प्रोटीनला 'स्नायूंचे बिल्डिंग ब्लॉक्स' म्हटले जाते. व्यायामानंतर स्नायूंच्या दुरुस्तीसाठी आणि त्यांच्या वाढीसाठी प्रथिनांचे पुरेसे सेवन आवश्यक आहे. प्रथिनेयुक्त आहारामुळे तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटते, ज्यामुळे आपोआप कॅलरीचे सेवन कमी होते आणि वजन कमी होण्यास मदत होते. चयापचय (चशींरलेश्रळीा) वाढवते: शरीराला फॅट्स किंवा कार्बो हायड्रेट्सच्या तुलनेत प्रथिने पचवण्यासाठी जास्त ऊर्जा खर्च करावी लागते. या 'थर्मिक इफेक्ट' मुळे तुमचा चयापचय दर वाढतो. संपूर्ण आरोग्य: प्रथिने हाडे, त्वचा, केस आणि रक्त यांचा महत्त्वाचा भाग आहेत. ते रोगप्रतिकारशक्ती (खार्ीिपळीं) वाढवून अनेक आजारांपासून शरीराचे संरक्षण करतात. प्रोटीनची कमतरता भरून काढण्यासाठी ५ महत्त्वाचे उपाय: शरीरातील प्रथिनांची कमतरता भरून काढण्यासाठी खालील ५ गोष्टींचा तुमच्या आहारात समावेश करा:

१. प्रत्येक जेवणात लीन प्रोटीन घ्या: तुमच्या दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणात लीन प्रोटीन असलेल्या पदार्थांचा समावेश करा. मांसाहारींसाठी: चिकन ब्रेस्ट, टर्की किंवा मासे खा. यात चरबी कमी आणि प्रोटीन जास्त असते. ग्रील केलेले चिकन किंवा मासे खाल्ल्यास पोट जास्त काळ भरलेले राहते. शाकाहारींसाठी: डाळी, चणे, क्विनोआ, टोफू खा. तुम्ही सूप, सलाड किंवा करीमध्ये डाळी आणि शेंगा घालून प्रोटीनची गरज पूर्ण करू शकता.

२. स्नॅक्समध्ये प्रोटीनचा वापर: भूख लागल्यावर चिप्स किंवा इतर तळलेले पदार्थ खाण्याऐवजी प्रोटीनयुक्त स्नॅक्स निवडा. ग्रीक योगर्ट, सुका मेवा (नट्स), बिया किंवा उकडलेले अंडे खा. मूठभर बदाम किंवा थोडे पनीर तुम्हाला ऊर्जा देईल आणि भूक नियंत्रित करेल.

३. दुग्धजन्य पदार्थ: दूध, दही आणि पनीर हे प्रथिनांचे उत्तम स्रोत आहेत. तुम्ही नाश्त्यात दही किंवा पन- ीरचा समावेश करू शकता.

४. नाश्त्याला महत्त्व: दिवसाची सुरुवात प्रोटीनयुक्त नाश्त्याने केल्यास दिवसभर तुमची ऊर्जा टिकून राहते. अंडी किंवा ओट्स (जर्ीी) मध्ये शेंगदाणे घालून खाणे फायदेशीर ठरते.

५. प्रमाण आणि वेळ: एकाच वेळी खूप जास्त प्रोटीन घेण्याऐवजी, ते दिवसभरातील जेवण आणि नाश्त्यामध्ये विभागून घ्या. यामुळे शरीराला प्रोटीनचा योग्य वापर करता येतो. सर्वसाधारणपणे, प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या शरीराच्या वजनाच्या प्रति किलोग्रॅम ०.८ ग्रॅम प्रोटीन दररोज घेतले पाहिजे.

## डॉक्टर टीप्स

डाएटकट्टा । कमी खाण्यापेक्षा कमी वेळा खाल्ल्याने आजारांवर मात । डॉ.

### वैवाहिक जीवन सुधारण्यासाठी विशेष टिप्स



६. आपल्या दोघांमधील नात घट्ट करण्यासाठी एकमेकांसोबत वेळ घालवून बोलण गरजेच आहे. यामुळे तुम्ही तुमची वैवाहीक जीवन चांगले एन्जॉय करू शकता आणि तुमचा पार्टनर तुमच्या जवळ येण्यास मदत होईल. ७. चांगल्या वैवाहीक जीवनासाठी तुमचे आरोग्य चांगल असणे महत्वाचे आहे, आणि त्यासाठी चांगले भोजन, व्यायाम आणि झोप घेणे गरजेचे आहे.या काही वैवाहीक टिप्स मुळे तुम्ही तुमची लाइफ खूप चांगली प्रकारे जगू शकता तसेच तुमच्या मध्ये असलेले मतभेद सुद्धा दूर होण्यास मदत होऊल.




## विनोद

छोटी सुमन बाबांना विचारते, 'बाबा लोणचे फार महाग असते का?' बाबा म्हणतात, 'नाही, पण तू का विचारतेस?' सुमन रडत रडत म्हणते, 'सकाळी माझ्या हातून थोडसे लोणचे तुमच्या नव्या सदऱ्यावर सांडले तर आई केवढे ओरडली.'

## संदेश

Tujse dosti karne ka hisab na aya,
mere kisi bhi sawal ka jawab na aya,
hum to jagte rahe tere hi khayalo me,
aur tujhe so kar bhi hamara khawab na aya

## सुविचार

परमेश्वर तरल आहे, परंतु विद्वेषपूर्ण नाही.

**अल्बर्ट आइनस्टाइन**




### संस्कृत सुभाषित

**विद्या नसे ज्या तप दान नाही । न ज्या गुण ज्ञान न शील काही ।। न धर्म भूमिप्रति भारकारी । पशूच ते मानव देहधारी ।।**

**अर्थ** –त्याग, श्रीगुरुंची कृपा, सत्यवाणी, शौर्य, अंत:करणाची निश्चलता व निरोगीपणा अशा गुणांची येथे प्रशंसा केली आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. शहिदांचे दिल्ली येथील स्मारक '--- --- ज्योती'
६. निर्णय
९. समुद्रकिनारा
१२. हिंदीत पशू
१४. डुक्कर
१५. गायीचे पिल्लू
१६. मुरुमाची जमीन
१८. रमापती
२०. खराब झालेला आंबा
२१. व्यक्ती, मनुष्य
२३. अनुयायी, पायदळातील शिपाई
२५. स्वामी
२६. समुद्र
२७. जास्तीत जास्त व कमीत कमी
२९. चालविणारा अवयव
३०. दारूचा एक प्रकार
३२. मलई
३३. दिवस
३४. मध
३६. सर्वस्व
३७. गाय
३८. खाली मान घातलेला
४०. रत्न
४२. श्रीविष्णुचे बटुरूप
४६. होडी
४७. आई
४८. वरपांगी, दिखाऊ
४९. मीठाची चव
५०. तीव्र ऊन
५२. भूतकाळ
५४. वाळवंट
५५. लक्ष्मीचे एक नाव
५७. नूतन
६०. षष्ठीची देवता
६२. वृक्ष
६३. वर्ष, साल
६५. अखेर
६७. उद्यानंतरचा दिवस
६९. वचक
७०. क्रिकेटच्या खेळातील सहा धावांचा फटका
७२. दाणे वगैरे कुटण्याचे पूर्वीचे साधन
७४. वाईट, नासके
७६. मकर
७७. नवा जोम, चपळता
८०. हात
८१. माळेत हे ओवतात
८२. माती नसलेली जमीन

### उभे शब्द

१. अव्यस्थित राहणारा
२. अंत:करण
३. गोव्यातील शिवशंभो
४. सोन्याचा वस्त्रातील धागा
५. शहर
६. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया
७. तुरूंग
८. लाट, हुक्की
१०. एक शेंगभाजी
११. आवड, रूची
१२. तारूण्य
१६. ठेकेदार
१७. आईचा भाऊ
१९. नवरदेवाची आई
२२. संतोष, आनंद
२४. गुणज्ञ
२५. चित्रपटाचा हिरो
२८. शेतकरी
२९. गरीब, क्षुल्लक
३०. दात
३१. जन्म-मृत्यू
३३. पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३५. रंगवलेले
३९. पुरुषांचे नेसण्याचे हे वस्त्र आता कालबाह्य होत चाललेय
४०. प्रजा
४१. खास, विशेष हकीगत
४२. शेतजमीन
४३. गोदाम
४४. पदार्थ शिजतानाचा आवाज
४७. पत्ता
५१. रड्या माणूस
५३. कर्ण
५६. खवा
५८. 'दारु' मोजण्याने बदनाम झालेले माप
५९. गाडीचे छत
६०. प्रश्न
६१. मुस्लिमांचा एक सण
६४. नट्टापट्टा
६६. बंगाली रुपया
६८. शुष्कता
७१. सुंदर तरुणी
७३. फणसाचा एक प्रकार
७४. गाढव
७५. बगळा
७८. रमणीय, मनोहारी
७९. पद्धत

### आडवे उत्तर

१.अमर जवान ६.निकाल
९.सागरतट १२.जानवर
१४.वराह १५.वासरू १६.मुरमाड
१८.रमावर २०.नासका २१.माणूस
२३.पाईक २५.नाथ २६.दर्या
२७.कमाल किमान २९.पाय
३०.रम ३२.साय ३३.वासर
३४.मकरंद ३६.तनमनधन
३७.गो ३८.अधोवदन ४०.रतन
४२.वामनावतार ४६.तर ४७.माय
४८.वरवर ४९.खारट ५०.रणरण
५२.गतकाल ५४.रण ५५.रमा
५७.नविन ६०.सटवाई ६२.तरू
६३.सन ६५.शेवट ६७.परवा
६९.दरारा ७०.षटकार ७२.खलबत्ता
७४.खराब ७६.मगर ७७.तरतरी
८०.कर ८१.मणी ८२.खडकाळ

### उभे उत्तर

१.अजागळ २.मन ३.रवळनाथ ४.जर
५.नगर ६.निवडणूक ७.कारा ८.लहर
१०.गवार ११.रस १२.तरूणाई
१६.मुकादम १७.मामा १९.वरमाय
२२.समाधान २४.कदरदान २५.नायक
२८.किसान २९.पामर ३०.रद ३१.जनन मरण ३३.वातावरण ३५.रंगीत ३९.धोतर
४०.रयत ४१.नवलविशेष ४२.वावर
४३.वखार ४४.तार ४५.रटरट ४७.मागमूस
५१.रडतराऊत ५३.कान ५६.मावा
५८.नवटाक ५९.टप ६०.सवाल ६१.ईद
६४.नखरा ६६.टका ६८.रखरख ७१.रमणी
७३.बरका ७४.खर ७५.बक ७८.रम्य
७९.रीत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### पाकिस्तानचे मोहसीन नक्कीने बीसीसीआयकडे मागितली माफी

नवी दिल्ली–आशिया चषक २०२५ च्या स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा पराभव करत नवव्यांदा आशिया चषकावर नाव कोरले. मात्र आशिया चषकात जेतेपद पटकावूनही अद्याप भारतीय संघाला ट्रॉफी मिळालेली नाहीय. आशियाई क्रिकेट कौन्सिलचे अध्यक्ष आणि पाकिस्तानचे मंत्री मोहसीन नक्कीच्या हस्ते आशिया चषक आणि वैयक्तिक पदकं स्वीकारण्यास भारतीय संघानं स्पष्ट नकार दिला होता. त्यानंतर मोहसीन नक्की ट्रॉफी घेऊन मैदानाच्या बाहेर निघून गेले. यानंतर बीसीसीआयने आक्रमक पवित्रा घेतला होता. तसेच काल (३० सप्टेंबर) आशियाई क्रिकेट कौन्सिलची दुबईत बैठक झाली. या आशियाई क्रिकेट कौन्सिलच्या बैठकीतही ट्रॉफीवरुन जोरदार राडा झाला. एसीसीच्या बैठकीत बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी आशिया चषकाच्या पारितोषिक वितरण सोहळ्याच्या वेळी घडलेल्या प्रकाराबाबत एसीसीचे अध्यक्ष मोहसीन नक्कीवर प्रश्नांची सरबत्ती केली. यानंतर मोहसीन नक्कीने उपरती घेत माफी मागितल्याची माहिती समोर आली आहे.
बीसीसीआयच्या आक्रमक भूमिकेनंतर अखेर पाक क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसिन नक्कीने बीसीसीआयकडे माफी मागितली. आपण नव्याने सुरुवात करु, क्रिकेटला मोठं करु, असं म्हणत मोहसीन नक्कीने उपरती घेतली. जे झालं ते व्हायला नको होतं, असंही मो-हसीन नक्की म्हणाले.

***


### ट्रॉफी घेऊन पळाला अफ्रिदीने मोहसीन नक्कीला दोन पर्याय दिले

दुबई –आशिया चषकाच्या स्पर्धेत अंतिम सामना जिंकल्यानंतर भारतीय संघाने एसीसीचे आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष तथा पाकिस्तानचे मंत्री मोहसीन नक्कीच्या हस्ते ट्रॉफी घेण्यास नकार दिला. त्यानंतर मोहसीन नक्की आशिया चषकाची ट्रॉफी घेऊन हॉटेलला निघून गेला. या सर्व घटनेनंतर मोहसीन नक्कीसह पाकिस्तानचा जगभारत अपमान झाला. त्यामुळे आता पाकिस्तानमधूनच मोहसीन नक्कीला विरोध सुरु झाला आहे. दरम्यान, आता पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी खेळाडू शाहीद अफ्रिदीने मोहसीन नक्कीवर निशाणा साधला आहे. शाहिद आफ्रिदीने आता मोह-सीन नक्कीला पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आणि राजकारण यापैकी एक काहीतरी निवडण्यास सांगितले आहे. तसेच शाहीद अफ्रिदीने विशेषत: मोहसीन नक्कीच्या सल्लागारांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शाहीद अफ्रिदीच्या या मागणीवरुन पाकिस्तानात खळबळ उडाली आहे. शाहीद अफ्रिदी नेमकं काय म्हणाला?मोहसीन नक्कीला माझी विनंती आहे की, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्षपद आणि त्यामुळे आशिया चषकाचा पारितोषिक वितरण सोहळा तासभरापेक्षा उशिरानं सुरु झाला. तेवढा वेळ मोहसीन नक्की हे एकटेच व्यासपीठावर उपस्थित होते.

***

### भारतविरुद्ध वेस्ट इंडिजचा उद्या कसोटी सामना रंगणार; टीम इंडिया कोणाला संधी देणार?

मुंबई –आशिया चषकानंतर आता टीम इंडिया वेस्ट इंडिज यांच्यात कसोटी मालिका रंगणार आहे. भारत विरुद्ध वेस्ट इंडिज पहिला कसोटी सामना उद्या म्हणजेच २ ऑक्टोबरपासून नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाईल. भारताची ही दुसरी कसोटी मालिका आणि २०२५–२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतली पहिलीच घरच्या मैदानावरील कसोटी मालिका आहे.
टीम इंडिया पहिल्या कसोटीत तीन प्रमुख वेगवान गोलंदाजांना मैदानात उतरवू शकते, ज्यामध्ये कुलदीप यादव फिरकी गोलंदाज असण्याची शक्यता आहे. तर वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजा या दोन अष्टपैलू खेळाडूंना प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. केएल राहुल आणि मोहम्मद सिराजसह अनेक प्रमुख खेळाडू कसोटी संघात परतणार आहे. ध्रुव जुरेलचा यष्टीरक्षक म्हणून प्लेइंग इलेव्हनमध्ये समावेश होऊ शकतो.



नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या वर्ल्ड पॅरा अॅथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये महिला डिस्कस थ्रो एफ४४ फायनलमध्ये भाग घेणारे मेक्सिकोचे ओसीरिस अनेथ मचाडो.

## भारत–वेस्ट इंडिज कसोटी मालिकेआधी टीम इंडियाला धक्का!

अहमदाबाद,१ ऑक्टोबर (पीएसआय)
वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याला सुरुवात होण्यापूर्वीच भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. भारताचा अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर हा सराव सत्रादरम्यान दुखापतग्रस्त झाला आहे. त्याच्या गोलंदाजी करणाऱ्या बोटाला दुखापत झाल्याचे वृत्त आहे, ज्यामुळे पहिल्या कसोटीत तो खेळण्याची शक्यता कमी झाली आहे.
काय आहे नेमके प्रकरण?
२ ऑक्टोबरपासून अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना सुरू होत आहे. या सामन्यासाठी भारतीय संघ कसून सराव करत असताना, अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरच्या बोटाला दुखापत झाली आहे. माहितीनुसार, सराव सत्रादरम्यान सुंदरच्या बोटाला गंभीर दुखापत झाली. यामुळे तो काही काळ सराव करू शकला नाही.
काही वेळाने तो पुन्हा गोलंदाजीसाठी आला असला तरी, त्याच्या फिटनेसवर संघ व्यवस्थापन बारीक लक्ष ठेवून आहे. ही दुखापत फार गंभीर नसल्याचे संकेत असले तरी, पहिल्या कसोटी सामन्यासाठी अंतिम ११ खेळाडूंची निवड करताना सुंदरच्या फिटनेसचा विचार केला जाईल.
शुभमन गिलच्या नेतृत्वात भारताचा सराव आशिया चषक २०२५ च्या विजयानंतर भारतीय संघ लगेचच कसोटी मालिकेसाठी सज्ज झाला आहे. शुबमन गिल पूर्णवेळ कसोटी कर्णधार म्हणून आपली पहिली घरची मालिका खेळणार आहे. गिलच्या नेतृत्वात संघ कसून सराव करत असून, यात जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांना पहिल्या सत्रातून विश्रांती देण्यात आली होती.
वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेत वॉशिंग्टन सुंदर हा रवींद्र जडेजा, अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांच्यासह फिरकी विभागातील महत्त्वाचा भाग होता. त्याची दुखापत टीम इंडियासाठी चिंतेची बाब ठरू शकते.

## युवराजच्या चेल्याचा धमाका, डेब्यूमध्येच ठोकलं वादळी शतक, ऑस्ट्रेलियाला धुतले!



कानपूर–आशिया कपमध्ये शुभमन गिल आणि अभिषेक शर्मा या टीम इंडियाच्या दोन्ही ओपनरनी विरोधी टीमना घाम फोडला. अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल हे भारताचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंगच्या तालमीमध्ये तयार झाले. वयाच्या अगदी लहानपणापासूनच या दोघांनी युवराजकडून क्रिकेटचे धडे घेतले. अभिषेक आणि गिल आज आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये जिथपर्यंत पोहोचले आहेत, त्याचं सगळं श्रेय हे युवराज सिंगला दिलं जातं. आता युवराज सिंगच्या आणखी एका चेल्याने शतक ठोकून टीम इंडियाचा दरवाजा ठोठावला आहे.८२ बॉलमध्ये ठोकलं शतक–काहीच दिवसांपूर्वी आयपीएलच्या पंजाब किंग्सचे दोन आक्रमक बॅटर प्रियांश आर्या आणि प्रभसिमरन सिंग युवराजसोबत ट्रेनिंग करताना दिसले होते. आयपीएल २०२५ मध्ये प्रियांश आर्याने फक्त ३९ बॉलमध्ये शतक ठोकून इतिहास घडवला होता.
आयपीएलमधल्या धमाकेदार कामगिरीनंतर प्रियांश आर्याची इंडिया ए मध्ये निवड झाली. ऑस्ट्रेलिया ए विरुद्धच्या पहिल्या अनौपचारिक वनडेमध्ये प्रियांश आर्याने ८२ बॉलमध्ये शतक ठोकलं आहे.
आर्याने त्याच्या या शतकी खेळीमध्ये ११ फोर आणि ५ सिक्स मारले. शतक पूर्ण केल्यानंतर दोनच बॉलमध्ये प्रियांशने स्पिनर तनवीर संघाच्या बॉलवर लॉन्ग–ऑफच्या फिल्डरकडे कॅच दिला. ऑस्ट्रेलिया ए ने टॉस जिंकल्यानंतर पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला, यानंतर प्रभसिमरन आणि प्रियांश या दोन्ही ओपनरनी १२३ बॉलमध्येच १३५ रनची पार्टनरशीप केली.
२४ वर्षांच्या प्रियांश आर्याने सुरूवातीच्याच ओव्हरमध्ये कट मारून इनिंगची सुरूवात केली आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या बॉलिंगवर आक्रमण केलं. सॅम एलियटच्या बॉलिंगवर प्रियांशने पहिली सिक्स मारली. ६० बॉलमध्ये प्रियांशने त्याचं शतक पूर्ण केलं, यानंतर त्याने ऑस्ट्रेलियाच्या बॉलिंगवर आणखी प्रहार केला. पुढच्या २२ बॉलमध्ये प्रियांशने त्याचं शतक पूर्ण केलं.
प्रियांश आर्याची इंडिया ए कडून ही पहिलीच मॅच आहे. फक्त एकाच वनडेसाठी त्याची भारतीय टीममध्ये निवड – रण्यात आली होती. कानपूरमध्ये होणाऱ्या पुढच्या दोन सामन्यांसाठी प्रियांशची जागा अभिषेक शर्मा घेणार आहे.प्रियांश आर्याशिवाय इंडिया ए चा कर्णधार श्रेयस अय्यरनेही या सामन्यात शतकी खेळी केली. श्रेयसने ८३ बॉलमध्ये ११० रन केले, ज्यात १२ फोर आणि ४ सिक्सचा समावेश होता. याशिवाय रियान परागने ६७ आणि आयुष बदोनीने ५० रनची खेळी केली. बॅटरच्या या धमाकेदार कामगिरीमुळे इंडिया ए ने ५० ओव्हरमध्ये ६ विकेट गमावून तब्बल ४१३ रन केले.



बीजिंगमधील वर्ल्ड टेबल टेनिस (डब्ल्यूटीटी) चायना स्मॅशमध्ये भाग घेणारे ब्राझीलचे ह्यूगो काल्डेरानो आणि ब्रुना ताकाहाशी.

## मी काहीही चूक केली नाही, टीम इंडियाला ट्रॉफी हवी असेल, तर...



दुबई–आशिया कपच्या ट्रॉफीवरून झालेल्या वादावर पाकिस्तान क्रिकेट बोर्ड तसंच आशियाई क्रिकेट परिषदेचा (एसीसी) प्रमुख मोहसिन नक्की याने मौन सोडलं आहे. आशिया कप ट्रॉफीच्या वादाला ७२ तास झाल्यानंतर नक्कीने या संपूर्ण घटनाक्रमावर प्रतिक्रिया दिली आहे. रविवारी भार-ताने आशिया कपच्या फायनलमध्ये पाकिस्तानचा पराभव केला, तेव्हाही आपण त्यांना ट्रॉफी द्यायला तयार होतो आणि आताही तयार आहोत. सूर्यकुमार यादव आणि त्याच्या टीमने एसीसीच्या ऑफिसमध्ये यावं आणि माझ्याकडून ट्रॉफी न्यावी, त्यांचं स्वागत आहे, असं नक्की म्हणाला आहे.
पीसीबीचा अध्यक्ष तसंच पाकिस्तानच्या गृह खात्याचा प्रमुख असलेल्या नक्कीने आपण बीसीसीआयची माफी मागितल्याच्या वृत्ताचंही खंडन केलं आहे. आपण काहीही चूक केलेली नाही, त्यामुळे माफी मागणार नाही, असं नक्की म्हणाला आहे.
'एसीसी अध्यक्ष म्हणून, मी त्याच दिवशी ट्रॉफी सोपवण्यास तयार होतो आणि मी अजूनही तयार आहे. जर त्यांना खरोखरच ट्रॉफी हवी असेल, तर त्यांनी एसीसी कार्यालयात येऊन माझ्याकडून घेऊन जावी. मी काहीही चुकीचे केलेले नाही. मी कधीही बीसीसीआयची माफी मागितली नाही आणि कधीही मागणार नाही,' अशी पोस्ट नक्कीने केली आहे.
भारतीय टीमने नक्कीकडून ट्रॉफी घ्यायला नकार दिल्यानंतर नक्की आशिया कपची ट्रॉफी घेऊन दुबईच्या स्टेडियममधून बाहेर पडले. नक्की याने ऑपरेशन सिंदूरवेळी आणि त्याआधीही भारताविरोधी भूमिका घेतली, त्यामुळे टीम इंडियाने नक्कीकडून ट्रॉफी स्वीकारायला नकार दिला. पण तरीही नक्की आशिया कपच्या फायनलनंतर झालेल्या सोहळ्यासाठी स्टेजवर उपस्थित राहिला. भारतीय खेळाडू ट्रॉफी घेण्यासाठी येत नसल्याचं लक्षात येताच नक्कीने एसीसीच्या अधिकाऱ्याला ट्रॉफी घेऊन जायला सांगितलं. आशिया कपच्या ट्रॉफीवरून झालेल्या या वादाचे पडसाद मंगळव-ारी एसीसीच्या बैठकीतही उमटले. राजीव शुक्ला आणि आशिष शेलार यांनी या मुद्द्यावरून मोहसिन नक्कीला घेरलं. नक्कीने ट्रॉफी वैयक्तिकरित्या ताब्यात ठेवली आहे, त्यामुळे लवकरात लवकर ट्रॉफी एसीसीच्या ऑफिसमध्ये आणावी, असं आशिष शेलार आणि राजीव शुक्ला बैठकीत म्हणाले. तसंच या मुद्द्यावरून आयसीसीकडे तक्रार करणार असल्याचा इशाराही बीसीसीआयने दिला आहे.

## वैभव सुर्यवंशीचे वादळी शतक, पण युवा खेळाडू भाव खाऊन गेला

दिल्ली–ऑस्ट्रेलियाला वनडे मालिकेत व्हाईटवॉश दिल्यानंतर टेस्ट मालिकेत टीम इंडियाने धमाकेदार सूरूवात केली आहे. टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाच्या विरूद्धच्या पहिल्यात टेस्ट सामन्यात ४२८ धावा केल्या आहेत. या धावा करण्यात वैभव सुर्यवंशीने मोलाची भूमिका बजा-वली होती. कारण वैभव सुर्यवंशीने या सामन्यात ११३ धावांच वादळी शतक ठोकलं आहे. वैभव सोबत भारताचा आणखी एक फलंदाज चमकला आहे.त्याने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांची धुलाई करत १४० धावांची शतकीय खेळी केली आहे. त्यामुळे वैभवच्या या खेळीपेक्षा त्या युवा खेळाडूच्या फलंदाजीची चर्चा आहे.
ऑस्ट्रेलिया विरूद्ध पहिल्या टेस्ट सामन्यात फलंदाजी करण्यासाठी वैभव सुर्यवंशी आणि कर्णधार आयुष्य म्हात्रे मैदानात उतरले होते.पण भारताची सूरूवात चांगली झाली नव्हती. कारण कर्णधार आयुष्य म्हात्रे २१ धावांवर स्वस्तात बाद झाला होता.त्याच्यापाठोपाठ विहान मल्होत्राही अवघ्या ६ धावांवर बाद झाला होता. त्यानंतर वैभव सुर्यवंशी आणि वेदांत त्रिवेदीने भारताचा डाव सावरला होता.
वैभव सुर्यवंशीने ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांची धुलाई करत ८६ बॉलमध्ये ११३ धावांची फटकेबाजी केली होती. या दरम्यान त्याने ८ गगनचुंबी षटकार आणि ९ चौकार लगावले होते. या खेळानंकर वेदांत त्रिवेदीने १४० धावांची शतकीय खेळी केली होती.या खेळी दरम्यान त्याने १९ चौकार लगावले आहे. या व्यतिरीक्त खिलान पटेलच्या ४९ धावा वगळता इतर खेळाडूंना मोठ्या धावा करता आल्या नाही. टीम इंडियाकडून सर्वाधिक धावा या वेदांत त्रिवेदीने केल्या. त्यामुळे वेदांत त्रिवेदी वैभव सुर्यवंशीच्या फलंदाजीसमो भाव खाऊन गेल्या.



तसेच वेदांत आणि वैभवच्या या शतकीय खेळीमुळे भारताचा पहिला डाव हा ४२८ धावांवर ऑल आऊट झाला होता. ऑस्ट्रेलियाकडून हेडन स्चिलर आणि विल मालकझुकन प्रत्येकी ३ विकेट घेतल्या. आर्यन शर्माने २ आणि थॉमस पॅडीग्टनने १ विकेट घेतली.
ऑस्ट्रेलिया कडून स्टीवेन हॉगने ९२ धावांची अर्धशतकीय खेळी केली. त्या व्यतिरीक्त इतर खेळाडूंना मोठ्या धावा करता आल्या नाही. त्यामुळे ऑस्ट्रेलिया २४३ धावांवर ऑल आऊट झाली होती. टीम इंडियाकडून दिपेश देवेंद्रनने ५, किशन कुमारने ३ तर अनमोलजित सिंह आणि खिलान पटेलने प्रत्येकी १ विकेट घेतली आहे. त्यामुळे टीम इंडिया १८५ धावांनी आघाडीवर आहे.

## तायडेचे संयमी शतक

**नागपूर**–रणजी विजेते विदर्भ आणि शेष भारत यांच्यात बुधवारपासून सुरू झालेल्या इराणी चषक क्रिकेट लढतीचा पहिला दिवस डावखुऱ्या खेळाडूंनी गाजवला. सलामीवीर अथर्व तायडे (नाबाद ११८) आणि यश राठोड (९१) या डावखुऱ्या फलंदाजांच्या झुंजार खेळींमुळे विदर्भाने दिवसअखेर ५ बाद २८० धावांची मजल मारली. शेष भारताकडून डावखुरा फिरकीपटू मानव सुथार (३६४) सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. जामठा येथील विदर्भ क्रिकेट संघटनेच्या स्टेडियमवरील या सामन्यात यजमानांनी नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र, त्यांची सुरुवात अडखळती झाली.

## चॅम्पियन्स लीग फुटबॉल : लिव्हरपूलला पुन्हा पराभवाचा धक्का; गॅलतासरायकडून पराभूत; रेयाल, बायर्नचा विजय

इस्तंबूल–यंदाच्या हंगामाची दमदार सुरुवात केल्यानंतर बलाढ्य लिव्हरपूल फुटबॉल क्लबला एकाच आठवड्यात दोन पराभवांचा सामना करावा ला-गला आहे. प्रीमियर लीगमध्ये क्रिस्टल पॅलेसकडून हार पत्करल्यानंतर लिव्हरपूलला चॅम्पियन्स लीगमध्ये गॅलतासरायकडून ०–१ असा पराभवाचा धक्का बसला. रेयाल माद्रिद, बायर्न म्युनिक आणि चेल्सी या संघांनी अपेक्षित विजय नोंदवले.गॅलतासरायविरुद्ध लिव्हरपूलने चेंडूवर अधिक वेळ ताबा राखला. मात्र, त्यांना गोलच्या फारशा संधी निर्माण करता आल्या नाहीत. त्यातच बचावात त्यांच्याकडून काही चुका घडल्या. मध्यरक्षकांचा खेळही निराशाजनक ठरला. गॅलतासरायला १६व्या मिनिटाला पेनल्टी मिळाली. यावर तारांकित आघाडीपटू व्हिक्टर ओसिमेनने गोल नोंदवला. त्यानंतर उत्तरार्धाच्या सुरुवातीला गॅलतासरायने गोलच्या दोन संधी वाया घालवल्या. मात्र, त्यांनी बचाव भक्कम राखताना सामना १–० असा जिंकला.दुसरीकडे, किलियन एम्बापेच्या हॅटट्रिकच्या जोरावर रेयाल माद्रिदने कझाकस्ताच्या एफसी कैरात संघाचा ५–० असा सहज पराभव केला.

## फलंदाजीसह गोलंदाजीला सहाय्य करणाऱ्या खेळपट्टीस पसंती: शुभमन गिल



अहमदाबाद–भारतीय संघ यापूर्वी मायदेशात खेळताना फिरकीला अनुकूल खेळपट्ट्यांवर खेळण्यास प्राधान्य द्यायचा. मात्र, आमचा विचार जरा वेगळा आहे. यापुढे फलंदाज आणि गोलंदाजांस समान संधी असणाऱ्या खेळपट्ट्यांवर खेळण्यास आमची पसंती असेल, अशी प्रतिक्रिया कसोटी क्रिकेट संघाचा कर्णधार शुभमन गिल याने व्यक्त केली.
भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात गुरुवारपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीसाठी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर हिरवीगार खेळपट्टी तयार करण्यात आली आहे. उष्ण आणि दमट वातावरणात अतिरिक्त गवत असलेली खेळपट्टी आम्हाला तिसरा वेगवान गोलंदाज खेळविण्याच्या मोहात पाडू शकते, असे सामन्याच्या पूर्वसंध्येला झालेल्या पत्रकार परिषदेत गिल म्हणाला.
मफआमची (संघ व्यवस्थापन) नक्की काय चर्चा झाली याबद्दल मी बोलू शकत नाही. परंतु, फलंदाजी आणि गोलंदाजीला साथ देणाऱ्या खेळपट्टीवर खेळण्याचा आम्ही यापुढे प्रयत्न करणार आहोत,फ्फ असे गिलने सांगितले.
मफभारतात खेळताना प्रतिस्पर्धी संघासाठी फिरकी आणि रिव्हर्स स्विंगचे मोठे आव्हान असते. आपल्याकडे कसोटी सामने अभावानेच पाच दिवस चालले आ-हेत. मात्र, आता प्रदीर्घ चालतील असे सामने खेळण्यासाठी आणि दर्जेदार कामगिरी करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत,फ्फ असे गिलने स्पष्ट केले.
आशिया चषक ट्वेन्टी–२० स्पर्धेनंतर कसोटी क्रिकेटशी जुळवून घेण्यासाठी खूप कमी वेळ मिळाल्याचे मान्य करून गिल म्हणाला, मफएका प्रारूपातून दुसऱ्या प्रारूपात खेळणे हे सर्व मानसिकतेवर अवलंबून असते. आम्हाला सरावासाठी फार संधी मिळाली नाही हे खरेच आहे. आता बचावाचे तंत्र अचूक राखण्यावर आणि योग्य नियोजनासह खेळण्यावर माझा भर राहील.फ्फ
संघरचनेबाबत स्पष्ट मत करणे गिलने टाळले. मफजसप्रीत बुमरा दोनही सामने खेळणार की नाही, हे पहिला कसोटी सामना किती वेळ चालतो आणि आमचे वेगवान गोलंदाज किती षटके टाकतात यावर अवलंबून असेल,फ्फ असे गिलने सांगितले. रवींद्र जडेजा सहाव्या क्रमांकावरच खेळणार असल्याचे त्याने नमूद केले. मफगेल्या दोन वर्षांत जडेजा चांगल्या लयीत आहे. त्याने आम्हाला अनेकदा कठीण परिस्थितीतून बाहेर काढले आहे. त्याच्याकडे खूप अनुभव आहे आणि त्याची कामगिरी आमच्यासाठी निर्णायक ठरू शकेल,फ्फ असे गिल म्हणाला.
चेस कसोटी किकेटमध्ये वेस्ट इंडिज संघाचा दर्जा सध्या खालावला ही नाकारून चालणार नाही. मात्र, तरी आम्ही गेल्या हंगामात न्यूझीलंडने ज्या प्रकारे भारतावर वर्चस्व राखले, त्याचेच अनुकरण करण्याचा प्रयत्न करू, असे वेस्ट इंडिजचा कर्णधार रॉस्टन चेस म्हणाला. गेल्या वर्षी न्यूझीलंडने भारतातील कसोटी मालिका ३–० अशी जिंकली होती. मफआम्ही जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत खूप मागे आहोत. आमचा दर्जाही उंचावलेला नाही. आम्हाला यातून बाहेर पडावे लागेल. आम्हाला जिंकण्याच्या मानसिकतेने खेळावे लागले. संघ म्हणून एकत्र राहावे लागेल. भारतात खेळणे आव्हानात्मक असेल. खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापक या सर्वांना एकमेकांना पाठिंबा देऊन मनोबल उंचवावे लागेल,फ्फ असेही चेस म्हणाला.

# रेणापूर तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून पहाणी

**लातूर/प्रतिनिधी :** सततच्या पावसामुळे आणि नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे नुकसानग्रस्त रेणापूर तालुक्यातील विविध गावांना भेटी देवून भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी पाहणी केली. ठिकठिकाणी शेतकरी, ग्रामस्थ यांच्याशी चर्चा करून नुकसानीची माहिती जाणून घेतली आणि नुकसान ग्रस्तांना निश्चितपणे सरसकट शासन मदत करणार असल्याचे बोलून दाखविले.

मागील काही दिवसात सर्वत्र प्रचंड पाऊस झाला. नदी नाल्याना पूर आले. या पावसाने आणि अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले. खरिपाची सोयाबीन, तूर व इतर पिकाचे मोठे नुकसान झाले. नदी नाल्याकाटच्या जमिनी वाहून गेल्या. सखल भागातील अनेक वस्त्यातील घरात पाणी शिरून नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीची पाहणी करण्यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी रेणापूर तालुक्यातील मौजे डिघोळ देशमुख, निवाडा, सिधंगाव, सांगवी, दर्जी बोरगाव, आरजखेडा या गावांचा दौरा करून नुकसानीची पाहणी केली.

या पाहणी दौऱ्यात गटविकास अधिकारी सुमित जाधव, नायब तहसीलदार सोनकांबळे, मंडल अधिकारी सानिया सौदागर, तालुका कृषी अधिकारी कांबळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शिंदे, जि.प. बांधकाम उपविभागाचे देवकर, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कुलकर्णी, पाटबंधारे विभागाचे अमित पाटील त्याचबरोबर भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष शरद दरेकर, महेंद्र गोडभरले, संगायो समिती अध्यक्ष सतीश आंबेकर, अँड दशरथ सरवदे, कुलदीप सूर्यवंशी,



वसंत करमुडे, माऊली भिसे, रामराव मोरे यांच्यासह संबंधित अधिकारी, मंडल अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक व इतर अनेकजण होते.

शेतकऱ्यासह नागरिकांनी दिलेल्या निवेदनांचा स्वीकार करून पाहणी दौऱ्यात ठिकठिकाणी शेतकरी आणि नागरिकांशी संवाद साधताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकही गंभीर संकटात सापडले आहेत. पावसामुळे शेतीबरोबरच रस्ते, लहान मोठे पूल, वीजपुरवठा काही ठिकाणी घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे सर्वच नुकसानीचे पंचनामे केले जाणार असून राज्यातील महायुतीचे सरकार आपल्या पाठीशी आहे नुकसानीपोटी सर्व शेतकऱ्यांना सरसकट शंभर टक्के नुकसान भरपाई देण्याचे काम शासन करणार असून शासनाच्या मदतीपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी काळजी घ्यावी अशा सूचना दिल्या.

आ. कराड यांच्या पाहणी दौऱ्यात त्या त्या गावातील नरेश चपटे, पंकज काळे, गोविंदराव देशमुख, रामभाऊ मुळे, शिवमूर्ती उरगुंडे, पृथ्वीराज उरगुंडे, विठ्ठल कस्पटे, सुनील चेवले, दत्ता चेवले, नानासाहेब कसपटे डॉ. परमेश्वर जाधव, भालचंद्र सूर्यवंशी, गुणवंत जोगदंड, जयद्रथ सावंत याप्रमुख कार्यकर्त्यांसह शेतकरी नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने होते.

## विशाल गिरी ॲक्टींग डान्स अकॅडमीच्या कौटुंबिक दांडिया महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद




**लातूर/प्रतिनिधी :** येथील विशाल गिरी ॲक्टींग डान्स अकॅडमीच्यावतीने नवरात्रीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कौटुंबिक दांडिया महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाला एकूण ४३० महिलांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. हा कार्यक्रम पूर्णपणे कौटुंबिक महोत्सव होता. या कार्यक्रमांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती काळजी घेण्यात आली. प्रवेश करतानाच आपण कोणाच्या ओळखीच्या आहात याची माहिती घेतली जात होती. लेखक- दिग्दर्शक विशाल गिरी यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता, या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. धर्मवीर भारती यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी मॉडेल्स आणि डान्सर्स सलोनी अग्रवाल, काजल भोसले यांनी जजची भूमिका निभावली. सपोर्टिंग पार्टनर्स म्हणून सुरेखा धर्मवीर भारती, वुमन्स विंग पूर्ण टीम यांनीही जबाबदारी छान निभावली. निवेदकाची जबाबदारी प्रवीण गिरी, विठ्ठल भारती यांनी पार पाडली . या कार्यक्रमाच्या नियोजनाची तयारी मागच्या पंधरा दिवसांपासून चालू होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोरिओग्राफर अर्चना सूर्यवंशी, पूजा शिंदे, अजिंक्य आदमाने, गणेश गिरी, विकास कांबळे, चैतन्य पुरी, बाळासाहेब भारती यांनी परिश्रम घेतले. यावेळी विजेत्यांना बक्षीस आणि सर्टिफिकेट देण्यात आले. हा कार्यक्रम पूर्णपणे कौटुंबिक दांडिया महोत्सव होता. दिग्दर्शक विशाल गिरी यांनी काही दिवसापूर्वी डफी चित्रपटाचे ऑडिशन घेतले होते. त्याचा निकालही यावेळी घोषित केला.यामध्ये फक्त सहा जणांची निवड करण्यात आली असून त्या सहा कलाकारांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

## सामुदायिक दसरा महोत्सव समितीची मिरवणूक यावर्षी रद्द

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर आणि परिसरातीलच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. अतिवृष्टीमुळे झालेले आर्थिक नुकसान व प्राणहानीमुळे भोगावे लागणारे संकट अधिक गडद झाले आहे. अशा दुःखद प्रसंगी प्रत्येक शेतकऱ्याला मदतीचा हात देणे गरजेचे आहे. अशा दुःखी शेतकरी बांधवांना मदतीच्या हाताचा बंधुभाव वेळप्रसंगी दाखविल्यास त्यांना दुःखातून सावरण्याची अनामिक उर्मी, ऊर्जा त्यांना मिळते. सदरील सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून लातूर शहरातील सामुदायिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने दरवर्षी मोठ्या प्रमाणात वाजत गाजत मोठ्या जल्लोषात सामुदायिक दसरा महोत्सव समितीची आयोजित होणारी मिरवणूक रद्द करण्यात येत असल्याची माहीती अध्यक्ष ईश्वर बाहेती व प्रदीप पाटील खंडापूरकर(बाबा)यांनी एका प्रसिद्धीपत्रकान्वये दिली आहे. सदरील प्रसिद्धीपत्रकात त्यांनी पुढे असे नमूद केले आहे की, सकाळी अकरा वाजता गांधी चौक आर्य समाज मंदिर, लातूर येथे ध्वजारोहण करून त्याच ठिकाणी मिरवणुकीचे विसर्जन करून कार्यक्रम थांबण्यात येणार आहे . तरी सामाजिक बांधिलकी मनामध्ये ठेवून सकाळच्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास महर्षी दयानंद क्रीडा मंडळ व सामुदायिक दसरा महोत्सव समिती लातूर च्य सर्व सभासदांनी सकाळी १० : ३० वाजता आर्य समाज मंदिर गांधी चौक लातूर येथे उपस्थित राहून ध्वजारोहण संपन्न करावा व शेतकऱ्यांच्या प्रति आपल्या भावना व्यक्त कराव्यात असे सामुदायिक दसरा महोत्सव समितीचे शहराध्यक्ष ईश्वर बाहेती, ग्रामीण अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा ,कार्याध्यक्ष जयप्रकाश दगडे, संयोजक श्रीकांत रांजणकर, संयोजक संतोष तोष्णीवाल,सरचिटणीस व्यंकटेश हालिंगे, कोषाध्यक्ष विष्णू भूतडा, दगडूसाहेब पडिले, शिवराज पानगावे, सुधाकर फुटाणे,ॲड. शिवलिंग कोरे आदी मान्यवरांनी केले आहे.

## लातूर येथील मेस्को क्षेत्रीय कार्यालयात लिपिक पदासाठी भरती

**लातूर/प्रतिनिधी :** येथील मेस्को क्षेत्रीय कार्यालयामध्ये लिपिक पदासाठी भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. यासाठी इच्छुक उमेदवारांनी आपल्या अर्ज व सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी १० ऑक्टोबर, २०२५ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे स्वत: उपस्थित राहावे. निवड करण्यात आलेल्या उमेवारास तात्काळ कामावर घेण्यात येणार आहे असे लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे, (नि.) यांनी कळविले आहे. जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक (जेसीओज तथा ओआर), माजी सैनिक विधवा व माजी सैनिक युद्ध विधवा यांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

## एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर यांना महाराष्ट्र शासनामार्फत तीन पुरस्कार प्राप्त



**लातूर/प्रतिनिधी :** नुकतेच एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय लातूर यांना महाराष्ट्र शासनामार्फत तीन पुरस्कार प्राप्त झाले असुन सदर पुरस्कार हे पुणे येथे एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आले.

या मध्ये मुख्यतः बेस्ट ग्रीन क्लब समन्वयक म्हणून प्रा. आर. पी. राजपुत, सर्वोत्तम पोस्टर प्रदर्शनासाठी कु. श्वेता किशोर भडके व मार्गदर्शक प्रा आर.पी. राजपुत तसेच सर्वोत्तम ग्रीन क्लब म्हणून एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, लातुर असे तब्बल तीन पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

सदर पुरस्कार मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र शासन) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

या वेळी व्यासपीठावर उच्च शिक्षण संचालक डॉ शैलेंद्र देवळाणकर, युनिसेफचे मार्गदर्शक श्री युसुफ कबीर तसेच विभागीय सहसंचालक डॉ व्ही व्ही जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजय रेवडकर, कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे, संचालक श्री राजेश्वर बुके, श्री बस्वराज एरटे, श्री काशिनाथ साखरे, सौ. ललितताई पांढरे, श्री बाबुराव तरगुडे, परिसर संचालक डॉ मोहन बुके, प्राचार्य डॉ एस एम जगदे, उपप्राचार्य प्रा विरभद्र बाळे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांतर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग २ ऑक्टोबर रोजी बंद राहणार

**लातूर/प्रतिनिधी :** दसरा सणानिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, ०२ ऑक्टोबर,२०२५ रोजी बंद राहील. तसेच शुक्रवार, ३ ऑक्टोबर,२०२५ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे.

## माजी सैनिक, शहीद परिवार आणि अवलंबितांसाठी लातूर येथे मार्गदर्शन शिबिर

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील माजी सैनिक, शहीद परिवार, विधवा आणि त्यांच्या अवलंबितांना केंद्र आणि राज्य सैनिक कल्याण विभागाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी लातूर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात महिला बचत गटांमार्फत १५ लाखांपर्यंत आणि स्वयंरोजगाराद्वारे ६ लाखांपर्यंत अनुदानाच्या योजनांची माहिती देऊन सैनिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे उद्दिष्ट आहे. हे मार्गदर्शन शिबिर ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे होणार आहे. जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## महावितरणमधील ग्राहकसेवेच्या कार्यालयांच्या पुनर्रचनेला प्रायोगिक तत्वावर प्रारंभ

### तत्पर ग्राहकसेवा अन् कर्मचाऱ्यांच्या कामांचे विभाजन- राज्यात १०३ नवीन कार्यालय तर ८७६ पदांची निर्मिती

### शहरी-ग्रामीणमध्ये ग्राहकसंख्येनुसार अभियंता, कर्मचारी - कर्मचाऱ्यांना कामाचा ताण कमी, कामकाजात सुसूत्रता

**लातूर/प्रतिनिधी :** महावितरण अंतर्गत थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आली आहे. या पुनर्रचनेला प्रायोगिक तत्त्वावर बुधवारी (दि. १) प्रारंभ होत आहे. येत्या महिन्याभरात कामाकाजाचा आढावा घेऊन पुनर्रचनेचा मसूदा अंतिम करण्यात येईल व दि. १ नोव्हेंबरपासून ही पुनर्रचना लागू करण्यात येईल. दरम्यान, या पुनर्रचनेच्या अंमलबजावणीच्या कालावधीत वीजग्राहकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याचे सर्वाधिकार परिमंडलांच्या मुख्य अभियंत्यांना देण्यात आले आहेत.

महावितरण अंतर्गत १६ परिमंडलांमध्ये १४७ विभाग, ६५२ उपविभाग व ३२७४ शाखा कार्यालय तसेच ४,१८८ उपकेंद्रांमध्ये सुमारे ४४ हजार अभियंते व तांत्रिक कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये प्रामुख्याने उपविभाग व शाखा कार्यालयांद्वारे नवीन वीजजोडणी, मासिक वीजबिल, सुरळीत वीजपुरवठ्यासाठी वीज यंत्रणेची नियमित देखभाल, तांत्रिक बिघाडांची दुरुस्ती, वीजबिलांची थकबाकी वसूली, वीजहानी कमी करणे आदी कामे करण्यात येतात. त्यामुळे अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांना एकाच वेळी १० ते १२ प्रकारची कामे करावी लागत आहे. ही रचना सुमारे २५ वर्षांपूर्वीची आहे व त्यावेळच्या ग्राहकसंख्येनुसार करण्यात आली होती.

पूर्वीच्या रचनेचा परिणाम गेल्या काही वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर आणि ग्राहकसेवेवर देखील झालेला दिसून येत आहे. त्यामुळे सरसकट कामांचा ताण कमी करून निवडक कामांची जबाबदारी द्या अशी मागणी गेल्या १० वर्षांपासून अभियंता व कर्मचाऱ्यांच्या संघटनांद्वारे करण्यात येत होती. व्यवस्थापनाने त्यासाठी विशेष समिती स्थापन करून कर्मचारी संघटनांशी वेळोवेळी चर्चा करून पुनर्रचनेचे प्रारूप तयार केले आहे.

प्रामुख्याने थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांच्या पुनर्रचनेवर भर देण्यात आला आहे. विशेष म्हणजे शहरी, ग्रामीण व दुर्गम भागांतील ग्राहकसंख्या व भौगोलिक क्षेत्रानुसार संबंधित उपविभाग व शाखा कार्यालयांची फेररचना करण्यात आली आहे. सोबतच ग्राहकसंख्येनुसार अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात आणखी २ विभाग कार्यालय, ३७ उपविभाग आणि ३० शाखा कार्यालयांची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. या कार्यालयांमुळे ८७६ अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदसंख्या देखील वाढली आहे. तर सध्या अस्तित्वात असलेल्या पदसंख्येत कोणतीही कपात होणार नाही. कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाला व आरक्षणाला कोणताही धक्का बसणार नाही याची काळजी घेण्यात आल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच परिमंडल, मंडल कार्यालयांसह संलग्न इतर कोणत्याही विभागांचा या पुनर्रचनेत समावेश करण्यात आलेला नाही.

अशी आहे पुनर्रचना महावितरणच्या विभाग कार्यालयांमध्ये कोणताही बदल न करता त्यात विभागीय देखभाल व दुरुस्ती पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. या १० सदस्यीय पथकात अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. विभागातील सर्व उपकेंद्र व ३३ केव्ही वीजवाहिन्यांची देखभाल व दुरुस्तीचे काम या पथकाकडे राहणार आहे. तसेच प्रत्येक विभागात सध्या अस्तित्वात सर्व उपविभागांचे महसूल व देयके तसेच देखभाल व दुरुस्ती अशी विभागणी करण्यात येईल. म्हणजे एका विभागात सध्या चार उपविभाग कार्यालय असल्यास पुनर्रचनेत देखभाल व दुरुस्ती तसेच महसूल व देयके असे प्रत्येकी दोन उपविभाग राहतील. देखभाल व दुरुस्ती उपविभागातील अभियंते व तांत्रिक कर्मचारी वीजयंत्रणेची देखभाल व दुरूस्तीचे कामे, नवीन वीजयंत्रणा उभारणे, वीजपुरवठ्याच्या तक्रारींचे निवारण आणि वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे कामे करतील. तर महसूल व देयके उपविभागातील अभियंते, कर्मचारी नवीन वीजजोडणी, अचूक बिलींग, बिलिंग तक्रारींचे निवारण, थकबाकी वसूली ही कामे करणार आहेत.


ग्राहकसेवेसाठी देखभाल व दुरुस्ती आणि महसूल व देयके अशी विभागणी करण्यात आल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कामांमध्ये आणखी सुसूत्रता येणार आहे. त्यांच्यावरील कामांचा ताण कमी होणार असून ग्राहकांना अधिक तत्परतेने महावितरणची सेवा मिळणार आहे. शहरी भागातील शाखा कार्यालयांमध्ये पुनर्रचनेत फेरबदल करण्यात आला आहे. तर ग्रामीण भागातील शाखा कार्यालयांच्या कार्यपद्धतीत अंशतः बदल करण्यात आला आहे.

या पुनर्रचनेमुळे महसूल व देयकांच्या ग्राहकसेवेसाठी तसेच सुरळीत वीजपुरवठ्यासाठी स्वतंत्र उपविभाग कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांना सरसकट सर्वच कामे एकाचवेळी करण्याऐवजी आता अधिक केंद्रीत (फोकस) पद्धतीने निश्चित केलेली निवडक कामे करता येईल. कामाचे नियमानुसार तास निश्चित होतील व कामाचा ताण देखील कमी होणार आहे. कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होणार आहे. पर्यायाने वीजग्राहकांना मिळणारी ग्राहकसेवा आणखी दर्जेदार होणार आहे.

या पुनर्रचनेमधून सद्यस्थितीत कमी ग्राहकसंख्येच्या नंदुरबार, वाशीम, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यांसह ३५ उपविभागांना या पुनर्रचेनमधून वगळण्यात आले आहे. तर सध्याच्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे बीड, नांदेड, धाराशिव व सोलापूर जिल्ह्यांमध्ये पुनर्रचनेची अंमलबजावणी पूरग्रस्त वीज यंत्रणेची उभारणी झाल्यानंतर होणार आहे.

## पाच नंबर चौक ते औसा रिंग रोडवरील नाल्याच्या कामाची माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्याकडून पाहणी

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज, बुधवार, १ ऑक्टोबर रोजी दुपारी लातूर शहरातील पाच नंबर चौक ते औसा रिंग रोडवर सुरू असलेल्या मोठ्या नाल्याच्या कामाची पाहणी केली.



आमदार देशमुख यांनी यावेळी उपस्थित असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांना कामाच्या अनुषंगाने काही महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. त्यांनी स्पष्ट केले की, सदर काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यात यावे.

या पाहणी दौऱ्यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव ॲड. समद पटेल, लातूर शहर महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तापडे, शहर अभियंता उषा काकडे, कनिष्ठ अभियंता वैभव स्वामी, स्वच्छता विभागप्रमुख कलीम शेख, झोनल ऑफिसर संतोष लाडलापुरे तसेच पप्पू देशमुख, गणेश एस.आर. देशमुख, ॲड. फारूक शेख आदींसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.




प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# जमीन खरवडली, विहीरी खचल्या कर्जवसुलीला ब्रेक : महायुती सरकार देणार मदत, आपल्या सगळ्या मागण्यांना हिरवा कंदील : आ. राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- सार्वत्रिक जनभावना लक्षात घेत दुष्काळी उपाययोजना तातडीने अंमलात आणण्यासाठी ओला दुष्काळ जाहीर करावा. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात शेतीचे अभुतपुर्व नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी अक्षरशः जमीन खरवडून गेली आहे, विहिरी गाळाने भरल्या आहेत. त्यासाठी मोठी भरपाई आवश्यक आहे. शेतकरी बांधवांकडून बँकांनी कर्जवसुली करू नये, निकषात न बसणाऱ्या बाबींसाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांकडे केली होती. भरीव नुकसान भरपाईच्या अनुषंगाने मुख्यमंत्री महोदयांनी दिलासा दिला आहे. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केलेल्या सगळ्याच मागण्यांना हिरवा कंदील मिळाला आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णयांची राज्यभरातील शेतकरी बांधवांना सविस्तर माहिती दिली आहे. कोणत्याही परिस्थितीत दिवाळीपूर्वी शेतकरी बांधवांना मदत दिली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या अत्यंत महत्वाच्या घोषणेसह शेतकरी हिताच्या अनुषंगाने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सातत्याने केलेल्या सर्व मागण्यांना देखील मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. आमदार पाटील यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यानिमित्ताने यश मिळाले आहे.

धाराशिव जिल्ह्यात यंदा खरीप हंगामात अभूतपूर्व अतिवृष्टी झाली. पिकांचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. अनेक ठिकाणी शेतजमीन खरवडून गेली, विहिरीत गाळ साचला. यातील अनेक बाबी एनडीआरएफच्या निकषात बसत नसल्या तरी सणासुदीच्या दिवसांत आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी तातडीने विशेष उपाययोजना राबवून दिवाळीपूर्वी आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी 'मित्र'चे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती.

कर्ज वसुलीसाठी बँका शेतकऱ्यांकडे सतत तगादा लावत असल्याच्या अनेक तक्रारी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार आमदार पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सर्व बँकांना वसुलीची सक्ती न करण्याचे निर्देश दिले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज यावरही शिक्कामोर्तब केले आहे. जमीन खरवडून गेली, विहिरींत गाळ गेला असेल तर नुकसानभरपाई द्यावी, शेतकऱ्यांकडील कर्जवसुलीला स्थगिती द्यावी आदी आमदार राणाजगजतिसिंह पाटील यांनी केलेल्या तिन्ही शेतकरी हिताच्या मागण्या मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केल्या आहेत.

'ओला दुष्काळ' हा शब्द तांत्रिकदृष्ट्या महसूल नियमावलीत (म्हणजेच चरहरीरीहीँर डरपव ठर्शीशर्पीश उेवश किंवा चरर्पीरश्र`ष ऊेीसहीं ठशश्रळशष) नसला तरी जनतेची सार्वत्रिक भावना ही जिल्ह्यात 'ओला दुष्काळ' जाहीर करावा अशी आहे. असे जिल्ह्यातील जनतेच्या वतीने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना तसे कळविले होते. त्युसार दुष्काळाच्या काळात ज्या उपाययोजना करण्यात येतात त्या सर्व लागू करण्याचा निर्णयही मंगळवारी झालेल्या बैठकीनंतर जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे बाधित नागरिकांना विविध सवलती मिळणार आहेत. शेतकऱ्यांच्या थेट खात्यात मदत येण्यासाठी ईकेवायसीची अटही शिथिल करण्यात आली आहे. ॲग्रीस्टॅकनुसार शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये मदतीचा निधी जमा केला जाणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

**आमदार पाटील बनले शेतकऱ्यांचा आवाज**

शेती, पिकांचे अतोनात नुकसान झाल्यामुळे निकष न लावता सर्व शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई देण्यात यावी, यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. मागील आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस औसा तालुक्यातील उजनी येथे आले असता आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केलेल्या मागणीनुसार सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याची घोषणा त्यांनी केली होती. मंगळवारी पुन्हा एकदा लिखित स्वरूपात करण्यात आलेल्या सर्व मागण्यांना हिरवा कंदील मिळाला आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केलेल्या सकारात्मक पाठपुराव्याचे हे यश आहे.

टंचाई जाहीर, अशा सवलती मिळणार

१) जमीन महसुलात सूट २) सहकारी कर्जाचे पुनर्गठन. ३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती. ४) कृषी पंपांच्या चालू विजबिलात ३३.५% सूट. ५) शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क माफ. ६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषांत काही प्रमाणात शिथिलता. ८) टंचाई जाहीर केलेल्या गावांत शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपांची वीजजोडणी खंडीत न करणे.

## तुळजापूर तालुक्याचे आ.राणा दादा पाटील यांच्याकडून हंगरगा येथे आर्थिक मदत



नळदुर्ग (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील हंगरगा नळ येथे मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे घरांची पडझड झाली होती त्या निमित्ताने आपल्या तालुक्याचे कर्तव्यदक्ष आ. राणा दादा यांच्या वतीने मदत करण्यात आली .

सायराबानो इरफान फकिर व तसेच जयश्री दिलीप कांबळे त्यांना यावेळी प्रत्येकी १० हजार रु चा धनादेश देण्यात आला .

यावेळी श्री गणेश सोनटक्के, सन्माननीय दत्ताजी राजमाने, विलास भाऊ राठोड, प्रवीण चौगुले,सुनील राजमाने,आबेद शेख महादेव बिराजदार,विनोद चौगुले,शिवराज पाटील, गुलाम फकीर, मन्सूर मासलदार, चंद्रकांत जाधव, चंद्रकांत पाटील, महादेव चौगुले शिवानंद स्वामी,संजय कलशेट्टी आप्पाराव कलशेट्टी, पंकज पाटील, चंद्रकांत जाधव,शिवराज पाटील मन्सूर महसूलदार, महादेव बिराजदार सिद्धेश्वर वाघोले,गुलाम फकीर, पंकज पाटील, चंद्रकांत पाटील, राजेंद्र कलशेट्टी,अप्पाराव कलशेट्टी,संजय कलशेट्टी, विनोद चौगुले, नवनाथ कांबळे,मधुकर कांबळे, दिलीप कांबळे, सुनील राजमाने, शिव खारे प्रवीण चौगुले, शिवा स्वामी, अबेद शेख, व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रात्रगस्ती दरम्यान संशईत इसम ताब्यात

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, वाशी पो.ठा.चे पथक दि.३०.०९.२०२५ रोजी वाशी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पथकास स्टार मार्केट तांदुळवाडी रोड वाशी येथे अंधाराचा दबा धरुन बसलेले एक इसम दिसून आल्याने पथकास त्याचा संशय आल्याने पथकाने त्यास हाटकले. यावर त्याची विचारपुस केली असता त्यानी आपली नाव- पोपट सर्जेराव माळी, वय ३९ वर्षे, रा. राउतमाळी पो. सिरसगाव ता. त्रंबकेश्वर जि. नाशिक असे सांगीतले. पोलीसांनी अशा रात्री अवेळी फिरण्याचे कारण विचारले असता त्यानी पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे दिल्याने ते माला विरूध्द गुन्हा करण्याच्या उद्देशाने तेथे फिरत असल्याचा पोलीसांचा संशय बळावल्याने त्यास ताब्यात घेउन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द गुन्हा नोंदवला आहे.

## अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली काल मंगळवार दि.३०.०९.२०२५ रोजी अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत १४ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले ५०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव, ४६० लिटर गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या २६ सिलबंद बाटल्या असे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे ७८,९९० आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात १४ गुन्हे खालीलप्रमाणे नोंदवण्यात आले आहेत.

## सात्विक आहार, चांगले विचार आणि भक्तीवरच जीवन सार्थक - किर्तनकार शिवलीला पाटील

भूम(प्रतिनिधी)- भक्ती, सात्विक आहार आणि चांगले विचार याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी स्पष्ट केले, कुणाचा ही हेवा करू नका, परमेश्वराची सेवा मनापासून करा, आयुष्यात कधीच कमी पडणार नाही. आज अनेक तरुण पिढ्या व्यसनाच्या आहारी गेल्या आहेत. व्यसनामुळे पिढी बर्बाद होते.

भक्तीचा मार्ग स्वीकारल्याशिवाय जीवन सार्थक होत नाही, असे कीर्तनात शिवलीला पाटील म्हणाल्या. शहरातील समर्थनगर नवरात्र महोत्सवात शुक्रवारी (दि. २६) शिवलीला पाटील यांनी प्रबोधन केले. या वेळी त्यांनी उपस्थितांना कुटुंबातील सदस्यांशी प्रेमाने वागा. आई-वडील, भाऊ-बहीण, सासू-सून यांच्याशी चांगला व्यवहार करा. मोबाइलचा वापर केवळ आवश्यकतेनुसार करा. मोबाइलपेक्षा घरातील संवाद जास्त महत्त्वाचा आहे. या वेळी माजी नगराध्यक्ष संयोगीता गाढवे यांच्या हस्ते शिवलीला ताईंचा सत्कार केला. कीर्तनासाठी पखवाज वादक बाबासाहेब पांचाळ, वाघ यांनी साथसंगत केली. तसेच भूम व सावरगाव (द) येथील टाळकरींची साथ असल्यामुळे कीर्तन अधिक रंगतदार झाले. शिवलीलाताईंचे संदेश ऐकून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत चेतन रा. भावनानगर फुलसर गुजरात हे दि.३०.०९.२०२५ रोजी आपल्या ताब्यातील ट्रक कुंभार हॉटेल समोर गंधोरा पाटीजवळ महामार्ग ३६१नळदुर्ग ते तुळजापूर महामार्गावर हायगयी व निष्काळजीपणे रोडवर मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## कळंबच्या कृषि उत्पन्न बाजार समिती कडून पुरग्रस्त शेतकरी बांधवांसाठी मदत!



कळंब (प्रतिनिधी)- येथील कृषि उत्पन्न बाजार समिती,चे कार्यक्षेत्रात तसेच कळंब तालुक्यात यावर्षी पावसाने थैमान घालून अतिवृष्टी होवून अनेक वेळा तालुक्यात पूरग्रस्त परिस्थिती निर्माण होवून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. शेतातील उभी पिके पाण्याने खराब झाली आहेत बाजार आवारात माल घेवून येणाऱ्या ८० ते ९० % लोकांचे सोयाबीन व इतर पिके नष्ट झाले आहेत . शेतकरयांना कृषि उत्पन्न बाजार समिती, यांचे कार्यालया मार्फत सभापती, उपसभापती व सर्व संचालक यांचे एक महिन्याचे मानधन व भत्ते तसेच सर्व कर्मचारी बांधव यांचे एक दिवसाचे वेतन अशी एकूण ५१ हजार ४०९ रु अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधव यांचे झालेले नुकसानी करीता पुरग्रस्त शेतकरी बांधवांना मदत करून सदरील धनादेश सभापती,उपसभापती,सर्व संचालक मंडळाचे वतीने तहसिलदार यांना देण्यात आला. यावेळी बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे उपसभापती श्रीधर भवर संचालक बाळासाहेब पाटील, नाना कोल्हे , भारत सांगळे, पिंटू लंगडे , हरिचंद कुंभार , सचिव दत्तात्रय वाघ यांची उपस्थिती होती .


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**पेन्शन अदालत २०२५-II साठी अधिसूचना**

पेन्शन अदालत २०२५ (II) १५.१२.२०२५ (सोमवार) रोजी डीआरएम कार्यालय सोलापूर येथे सकाळी ११:०० वाजता आयोजित केली जाईल. या अदालतीचा मुख्य उद्देश विद्यमान धोरण मार्गदर्शक तत्त्वांच्या चौकटीत पेन्शनधारकांच्या तक्रारींचे त्वरित आणि जलद निवारण करणे हा असेल. मध्य रेल्वे, सोलापूर विभागातून निवृत्त झालेले कर्मचारी आणि पेन्शनबाबत तक्रारी असल्यास डीआरएम(पी)/सोलापूर पाठवू शकतात. हे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (पी), मध्य रेल्वे, मोदी खाना, सोलापूर-४१३००१ यांना उद्देशून असावे. अर्ज/तक्रारी **३१/१०/२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी** डीआरएम(पी) सेटलमेंट सेक्शनमध्ये ठेवल्या जाणाऱ्या बॉक्समध्ये देखील जमा करता येतील. निवेदनात नाव, पदनाम, विभाग, नियुक्तीची तारीख, निवृत्तीची तारीख, पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) ची प्रत आणि तक्रारीचे स्वरूप, बँकेचे नाव आणि खाते क्रमांक, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत, आधार कार्ड यांचा समावेश असावा. निवेदन सादर करण्याची शेवटची तारीख ३१/१०/२०२५ रोजी १५:०० वाजता आहे. **तपशीलवार सूचनांसाठी, कृपया विभागीय वेबसाइट पत्त्यावर लॉग इन करा - cr.indianrailways.gov.in - आमच्याबद्दल - विभाग- सोलापूर कर्मचारी - सूचना -**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्मिक)
सीआर, सोलापूर
Akar/Sur-64

रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**कॅरिज वॉटरिंग ॲक्टिव्हिटीचे कंत्राट काम**

**निविदा सूचना क्रमांक: GEM/2025/B/6744662. दिनांक: ३०.०९.२०२५.**

डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवीत आहेत. **परिसरासह कामाचे नाव:** सोलापूर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर कॅरिज वॉटरिंग ॲक्टिव्हिटीचे कंत्राट काम तीन वर्षांच्या कालावधीसाठी मनुष्यबळ आधारावर जीईएममध्ये खुल्या निविदेद्वारे. **निविदा प्रणाली:** दोन पॅकेट प्रणाली. **कामाची अंदाजे किंमत:** ४,३४,००,५४६.२६. **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य. **निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता:** डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. **जमा करावयाची बयाणा रक्कम:** ३,६७,०१०/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** काम सुरू झाल्यापासून तीन वर्षे. **निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** २४.१०.२०२५ रोजी ०९.००. **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** २४.१०.२०२५ रोजी ०९.३०. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक असलेले ठिकाण जिथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल: **www.GeM.gov.in**

सीनियर डीएमई
सीआर, सोलापूर
Akar/Sur-66

रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

**निविदा सूचना क्रमांक. SUR/L/T/2024/09R.** वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर, आणि भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावर २० बेडच्या आरपीएफ बॅरेकच्या तरतुदीशी संबंधित कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. (पुनर्निमंत्रण). **अंदाजे किंमत:** १९,९०,३०९.११. **बोली सुरक्षा:** ३९,८००/-. **काम पूर्णता कालावधी:** ०९ महिने. **ऑफरची वैधता:** ६० दिवस. **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** २४.१०.२०२५ रोजी **१५:०० वाजता.** बोली सुरक्षा खर्च **www.ireps.gov.in** वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (जी)
सीआर, सोलापूर
Akar/Sur-63

रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे



**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **PURANIK SUNIL TRAMBAKE**. TO: **SUNIL TRIMBAK PURANIK.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SUNIL TRIMBAK PURANIK** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **PURANIK SUNIL TRAMBAKE**
NEW NAME:- **SUNIL TRIMBAK PURANIK.**
Address :- 27/838, BHAGIRATHI NIWAS, SAMTA COLONY, NEAR N. P. SCHOOL NO.11, OSMANABAD.413501.
Adhar no.-629948099711
Mob. No.-9423734936

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **RAKHELKAR MEENAKSHI BHALCHANDRA.**
TO: **ANAGHA SUNIL PURANIK.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **ANAGHA SUNIL PURANIK** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **RAKHELKAR MEENAKSHI BHALCHANDRA.**
NEW NAME:- **ANAGHA SUNIL PURANIK.**
Address :- 27/838, BHAGIRATHI NIWAS, SAMTA COLONY, NEAR N. P. SCHOOL NO.11, OSMANABAD.413501.
Adhar no.-755091413210
Mob. No.-9423734936

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649